रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २०१
www.ramprahar.com

बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कामोठ्यात मद्यधुंद चालकाने तिघांना चिरडले; दोघांचा मृत्यू/३

मालमत्ता कर थकबाकीदारांवर पनवेल मनपा करणार कारवाई/६

शरीरसौष्ठवपटू निलेश दगडे, पूनम लोकरे ठरले विजेते/८

## राष्ट्रवादी नाव, पक्षचिन्ह अजित पवारांना; आयोगाचा निर्णय



**नवी दिल्ली** : राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर खरा पक्ष कुणाचा याबाबतची सुनावणी पूर्ण झाली असून निवडणूक आयोगाने निकाल देत अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे खासदार शरद पवार गटाला धक्का बसला आहे. जुलै महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. तत्कालीन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीबरोबर जात उपमुख्यमंत्रिपदाचा कारभार स्वीकारला. सात मंत्र्यांनी त्यांच्याबरोबर मंत्रिपदाची शपथ घेतली तसेच त्यांच्यासोबत अनेक आमदारही गेले. शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादीचेही प्रकरण निवडणूक आयोगाकडे गेले. गेल्या सहा महिन्यांपासून निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस फुटीचे प्रकरण प्रलंबित होते. या कालावधीत सुनावण्या झाल्या. अखेर अजित पवार गटाला राष्ट्रवादीचे पक्षचिन्ह आणि नाव देण्यात आले आहे. त्यामुळे आगामी राज्यसभा निवडणुकीत खासदार शरद पवार गटाला पक्षचिन्ह व नावासाठी तीन पर्याय सुचवण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

# गाव चलो अभियानातून भाजप नागरिकांशी साधणार व्यापक संवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षातर्फे ४ ते ११ फेब्रुवारी या काळात व्यापक जनसंपर्कासाठी गाव चलो अभियान सुरू झाले आहे. यात भाजपचे सर्व वरिष्ठ नेते तसेच प्रदेश पदाधिकारी, खासदार, आमदार त्यांना दिलेल्या गावात एक दिवस मुक्कामी राहणार असून नागरिकांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी मंगळवारी (दि. ६) येथे पत्रकार परिषदेत दिली.

या अभियानाच्या अनुषंगाने सरकारी योजनेतील लाभार्थी, बचत गट, धार्मिक स्थळांना भेट, नैपुण्यप्राप्त विद्यार्थी व खेळाडू, भाजप जनसंघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, समाज क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तिमत्व अशा सर्वांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या वेळी पत्रकारांना पुढे माहिती देताना त्यांनी सांगितले की, उत्तम संघटनात्मक बांधणी करीत, विकासाचा अजेंडा डोळ्यांसमोर ठेवून भाजप कार्य करीत आहे. तळागाळातील प्रत्येक मतदारापर्यंत मोदी सरकारचे मागच्या १० वर्षांतील प्रभावी कार्य, मागील जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्तता, विकसित भारताचा संकल्प सांगणाऱ्या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती पोहचण्याच्या उद्देशाने गाव चलो अभियान हाती घेण्यात आले आहे.

### प्रमुख नेते करणार मुक्काम

गाव चलो अभियान अंतर्गत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर जिल्ह्यातील पारडसिंगा येथे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा (ता. कळमेश्वर), प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे अमरावती जिल्ह्यातील साऊर येथे, केंद्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे विलेपार्ले येथे, मावळचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर पनवेल तालुक्यातील नेरे येथे, आमदार महेश बालदी न्हावे येथे, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील मावळ विधानसभेतील तुंगार्ली येथे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील खारघर येथे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी खालापूर तालुक्यातील चौक येथे, तर पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत महापालिका हद्दीतील प्रभाग ९ येथे एक दिवस राहणार आहेत. याशिवाय मुंबई अध्यक्ष आशिष शेलार हे गुरामवाडी (ता.मालवण), रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे हे जालना जिल्ह्यातील वालसावंगी येथे एक दिवस मुक्कामास जाणार आहेत. पीयूष गोयल, डॉ. भारती पवार, डॉ. भागवत कराड, कपिल पाटील हे केंद्रीय मंत्रीही या अभियानात सहभागी होणार आहेत. शहरी भागात वॉर्डनिहाय अभियान राबविले जाणार आहे.

सेवाव्रत हे भाजपचे मूळ अंग असून मोदीजींची गॅरंटी काय आहे हे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचवण्यासाठी मागच्या १० वर्षांतील मोदी सरकारच्या योजना व उल्लेखनीय कामगिरीची माहिती देणारी पत्रकेही वितरित करण्यात येणार आहेत.

याचबरोबर या अंतर्गत ५० हजार युनिट्समध्ये भाजपचे ५० हजार प्रवासी नेते प्रत्येक मतदारापर्यंत पोहचणार आहेत. पक्षाचे आजी व माजी खासदार, आमदार, जि.प सदस्य यांच्यासोबतच सर्व नेतेमंडळी राज्यभरातील प्रत्येक युनिटमध्ये प्रवास करतील व त्यांना ३२ हजार सुपर वॉरियर्सचेदेखील सहकार्य मिळेल. प्रत्येक युनिटमध्ये भाजपचा प्रवासी नेता एक दिवस मुक्काम करून बूथ प्रमुखांच्या बैठका, नागरिकांच्या भेटी, नवमतदारांशी चर्चा अशी आखून दिलेली १८ संघटनात्मक कामे करणार आहेत. या अभियानांतर्गत एका लोकसभेत साधारण साडेतीन लाख घरांना भेटी देण्याचे उद्दिष्ट आहे तसेच लवकरच पंतप्रधान मोदी हे शक्तिवंदन कार्यक्रमाद्वारे महिला बचत गट प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत, अशीही माहिती या वेळी देण्यात आली.

शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठासाठी पुरेसा निधी देणार

### उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या अंतर्गत विकासासाठी आवश्यक असे प्रस्ताव तयार करावेत. या सर्व प्रस्तावांना शासनस्तरावरून मंजुरी देण्यात येईल तसेच विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्येमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी (दि.६) माणगावमधील लोणेरे येथे दिली. ते विद्यापीठात आयोजित रौप्य महोत्सवी क्रीडा महोत्सवाच्या समारोप समारंभात बोलत होते.

या समारंभास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी विश्वनाथ काळे, कुलसचिव डॉ.अरविंद किवळेकर यांच्यासह क्रीडा विभागातील सर्व सहसमन्वयक आणि विविध समित्यांचे समन्वयक उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना मंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, तंत्रशास्त्र विद्यापीठाचे महत्त्व खूप मोठे आहे. पुढील वर्षी विद्यापीठांतर्गत किमान तीन हजार विद्यार्थी जगातील वेगवेगळ्या देशांत पाठविण्यासाठी प्रयत्न व्हावेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ हे एक आदर्श विद्यापीठ व्हावे यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत.

लोणेरे येथील विद्यापीठात २५वी आंतरराष्ट्रीय स्पर्धा येथे घेण्यात आली याबद्दल मनस्वी आनंद होत आहे. खेळामध्ये सर्वांनी एकमेकांना समजावून घेणे आवश्यक असते. सर्व खेळांच्या मैदानासाठी आवश्यक असलेला निधी देण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न केला जाईल. मुलींच्या वसतिगृहासाठी तसेच खेळांच्या मैदानासाठी आवश्यक निधी दिला जाईल, असे सांगून सर्व विद्यार्थ्यांनी खेळाडू वृत्ती जोपासावी व चालना देऊन येथे राष्ट्रीय स्तरावरचे क्रीडांगण तयार करावे, जेणेकरून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय राज्य व राष्ट्रीय स्तरीय खेळ येथे आयोजित करता येईल.

या वेळी क्रीडा संकुलातील फुटबॉल, खो-खो व कबड्डी मैदान, मुलींचे वसतिगृह, नूतनीकृत सभागृहाचे उद्घाटन तसेच कार्यशाळा इमारतीचे भूमिपूजन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले.

कुलगुरू डॉ. कारभारी विश्वनाथ काळे यांनी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणारे उपक्रम, अभ्यासक्रम तसेच एकूण वाटचालीची माहिती दिली.

## निवडक

### फटाका फॅक्टरीला आग लागून आठ जणांचा मृत्यू

**भोपाळ** : मध्य प्रदेशच्या हरदा जिल्ह्यातील बैरागढ फटाका फॅक्टरीला आग लागून झालेल्या स्फोटात आठ जणांचा मृत्यू, तर ७०हून अधिक लोक होरपळले आहेत. या ठिकाणी साधारण २० ते २५ लोक अडकल्याची भीती आहे. त्यामुळे मदत आणि बचावकार्यही सुरू करण्यात आले. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

### उत्तराखंडमध्ये लिव्ह-इन रिलेशनशिपसाठी कडक नियम

**डेहराडून** : उत्तराखंड विधानसभेत समान नागरी संहिता विधेयक सादर करण्यात आले. या कायद्यात लिव्ह-इन रिलेशनशिपसाठी कडक नियम आहेत. त्यानुसार रिलेशनशिपमध्ये फक्त एक प्रौढ पुरुष व एक प्रौढ महिला राहू शकतात. आधीच विवाहित, रिलेशनशिपमध्ये किंवा निषिद्ध संबंधात नसावेत. लिव्ह-इन व्यक्तीसाठी नोंदणीकृत वेब पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. अन्यथा सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवास, २५ हजार रुपये दंड या दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## पेट्रोलने भरलेल्या मालगाडीच्या बोगीला आग

### चौक रेल्वेस्थानकात अनर्थ टळला





**खोपोली, चौक, खालापूर : प्रतिनिधी**

पेट्रोलने भरलेल्या मालगाडीच्या बोगीने चौक रेल्वेस्थानकात पेट घेतल्याची घटना मंगळवारी (दि.६) सकाळी घडली. सुदैवाने अपघातग्रस्त मदत पथक, प्रशासकीय व पोलीस यंत्रणा तसेच स्थानिकांच्या तातडीची मदतीमुळे अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार इंडियन ऑईल कंपनीचे उत्पादन असलेल्या पेट्रोलची वाहतूक करणारी मालगाडी सोमवारी पनवेल-कर्जत रेल्वेमार्गावरील चौक स्थानकात थांबली होती. मंगळवारी सकाळी १०च्या सुमारास अचानक १९ क्रमांकाच्या बोगीला आग लागली. रूळालगतचे सुके गवत पेटल्यानंतर आग भडकली.

सामाजिक कार्यकर्ते निखिल मालुसरे, श्याम साळवी यांनी तातडीने पोलीस, अग्निशमन दल यांना माहिती देत अपघातग्रस्त मदत पथकाला पाचारण केले. बोगी पेट्रोलची असल्याने तातडीने खोपोली, रसायनी भागातून अग्निशमन बंब घटनास्थळी पोहचले. अपघातग्रस्त मदत पथकाचे गुरूनाथ साठीलकर, रसायनतज्ज्ञ धनंजय गीधदेखील हजर झाले होते. सुदैवाने थोड्या वेळाने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. वेळेवर मदत मिळाल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

या वेळी गीध व साठीलकर यांच्यासह वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, सहाय्यक निरीक्षक युवराज सुर्यवंशी, पाताळगंगा फायर ब्रिगेडचे प्रमुख आशिष मोरे, रेल्वे पोलीस निरीक्षक आशिष कुमार, सामजिक कार्यकर्ते, गिरीश जोशी, तन्वीर शेख, फिरोज शेख, गणेश कदम, आशिष चौधरी, स्वप्नील सोनटक्के यांच्यासह इतरांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी धावपळ केली.

> **सुदैवाने बोगीच्या वर असलेले वेफर व्हॉल्व काम करीत असल्याने स्फोट झाला नाही. एका बोगीत २७ टन पेट्रोल अशा एकूण ५२ बोगी असल्याने मोठा धोका होता, परंतु वेळेवर यंत्रणा पोहचल्याने अनर्थ टळला.**
>
> **-धनंजय गीध, रसायनतज्ज्ञ, तथा सदस्य, अपघातग्रस्त मदत पथक**

## मोदी सरकारच्या विकासाचे लाभार्थी!

### उद्धव ठाकरेंच्या 'वंदे भारत' प्रवासावरून भाजपचा टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे कोकण दौऱ्यावर होते. त्यांची जनसंवाद यात्रा सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीत झाली. ठिकठिकाणी उपस्थितांना संबोधित करताना ठाकरेंनी भाजप आणि केंद्र सरकावर तसेच राज्य सरकारवर टीका केली. कोकण दौरा आटोपल्यावर ठाकरे यांनी सपत्नीक चिपळूण ते मुंबई असा प्रवास वंदे भारत ट्रेनने केला. यावरून भाजपने टोला लगावला आहे.



उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे यांच्यासह ठाकरे गटाचे नेते, पदाधिकारी यांनी वंदे भारत ट्रेनमधून प्रवास केला. यावरून भाजपने अधिकृत ट्विटर हँडलवरून एक पोस्ट शेअर केली असून उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. मोदी सरकारच्या विकासाचे लाभार्थी... वंदेभारत ट्रेनचा आरामदायी प्रवास... तिसरी बार..... मोदी सरकार !, अशी पोस्ट भाजपने एक्सवर केली आहे. यात उद्धव ठाकरे यांचा वंदे भारत ट्रेनने प्रवास करतानाचा फोटोही शेअर करण्यात आला आहे.

दुसऱ्या पोस्टमध्ये भाजपने म्हटले आहे की, हीच तर मोदींची गॅरंटी आहे. कुठे आहे विकास? म्हणून ओरडणारे उबाठा जेव्हा वंदे भारत ट्रेनमधून प्रवास करून लाभार्थी होतात तेव्हा समाधान वाटते. लवकरच बुलेट ट्रेनचीदेखील सफर घडवून आणणार हे नक्की, कारण मोदी है तो मुमकीन है, असे दुसऱ्या पोस्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. यामध्ये उद्धव ठाकरे यांच्यासह मिलिंद नार्वेकर आणि खासदार विनायक राऊत दिसत आहेत.

## राहुल गांधींचा व्हिडीओ व्हायरल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी श्वानाच्या पिल्लाला बिस्किटे खाऊ घालतानाचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे.



**कुत्र्याने नाकारलेली बिस्किटे कार्यकर्त्याला दिल्याचा आरोप**

व्हिडीओमध्ये राहुल गांधी श्वानाच्या पिल्लाला बिस्कीट खायला घालताना दिसतात आणि नंतर पिल्लाने नाकारल्यानंतर त्यांनी ते बिस्कीट कार्यकर्त्याला दिले. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर भाजपने राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी हा व्हिडीओ शेअर करीत म्हटले की, काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी पक्षाच्या बूथ एजंटची तुलना श्वानांशी केली होती आणि इथे राहुल गांधींनी श्वानाने नाकारलेली बिस्किटे त्यांच्या कार्यकर्त्याला दिली आहेत. यासोबतच मालवीय यांनी नमूद केले की, एखाद्या पक्षाचा युवराज आपल्या कार्यकर्त्यांना श्वानासारखे वागवत असतील, तर असा पक्ष नाहीसा होणे स्वाभाविक आहे. त्यांनी पुढे या पोस्टमध्ये, आता 'शहजादा' पक्षाच्या कार्यकर्त्याला श्वानाने नाकारलेले बिस्किट देत आहे. हाच त्यांच्या कार्यकर्त्यांचा, समर्थकांचा व मतदारांचा आदर आहे का, असा सवालही केला आहे.



**पनवेल : भाजप माथाडी, ट्रान्सपोर्ट, सुरक्षारक्षक आणि जनरल कामगार युनियनचे उपाध्यक्ष संजय भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ब्रिजेश पटेल, रायगड जिल्हा माथाडी कामगार युनियनचे अध्यक्ष अनिल खोपडे, भाजप खारघर सरचिटणीस तुकाराम कंठाळे, भटके विमुक्त आघाडी शहराध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, अमृत भगत, श्रीधर भगत, अजय भगत, सुहास भगत, मनोहर भगत, राजू भगत, प्रवीण भगत, योगेश भगत, कैलास रक्ताटे, लखीचंद ठाकरे, विनोद डाकी, ऋतुजा म्हात्रे-महामुनी, दिवेकर आदी उपस्थित होते. (अधिक छायाचित्र पान ३ वर..)**

## शेतजमिनीचा अकृषक वापर करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेतजमिनीचा अकृषक वापर करणाऱ्या १० हजार २४३ जणांना महसूल विभागाने दणका दिला आहे. या अनधिकृत बांधकामांना ३५ कोटी ६६ लाख १४ हजार ३५८ रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी आठ कोटी ३५ लाख ४७ हजार ९०७ रूपयांचा दंड वसूल करण्यात प्रशासन यशस्वी ठरले आहे. उर्वरित २७ कोटी ३० लाख ६६ हजार ४५१ रुपयांचा दंड अद्याप वसूल होऊ शकला नाही.

वाढते औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे रायगड जिल्ह्यात जमिनीचे दर वाढत चालले आहेत. मुंबईला लागून असलेला जिल्हा आणि आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळ साकारत असल्यामुळे इथं जमिनीत गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. शिवाय मुंबईला समुद्रमार्गे जवळ असलेल्या अलिबाग परिसरात जागा घेऊन सेकंड होम बांधले जात आहेत. अनेक उद्योगपती आणि सेलिब्रेटीजनी या भागात जमिनी खरेदी केल्या आहेत. तेथे बंगले उभे राहत आहेत. काही जण भविष्यासाठी गुंतवणूक म्हणून जमीन खरेदी करीत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शेतजमिनीचा बिनशेती वापर वाढला आहे.

शासनाची कुठलीही परवानगी न घेता शेतजमिनीचा अकृषक वापर करण्याचे प्रमाण अलीकडच्या काळात वाढले आहे. त्यावर महसूल विभाग नजर ठेवून आहे. **(पान २ वर..)**

# श्रीक्षेत्र पंढरपूर विकासासाठी परिपूर्ण आराखडा करावा; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**



श्रीक्षेत्र पंढरपूर येथे वारकरी, भाविकांना मूलभूत पायाभूत सुविधा देण्यासाठी पंढरपूरचा सर्वांगीण विकासी करण्यात येणाऱ्या आराखड्यात दर्शन रांग, मंदिर व परिसर, घाट बांधकाम, आपत्ती व्यवस्थापन या सर्व बाबींचा विचार करून परिपूर्ण आराखडा सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि.६) येथे दिले.

पंढरपूर विकास आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, नियोजन विभागाचे सचिव सौरव विजय, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ अवसेकर महाराज आदी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

पंढरपूर यात्रा कालावधीत गर्दीचे विकेंद्रीकरण करणे तसेच गर्दीचे व्यवस्थापन करणे अत्यंत जीकिरीचे होत असते. याकरिता मंजूर विकास योजनेतील प्रदक्षिणा मार्गाकडून मंदिराकडे येणारे आणि प्रदक्षिणा मार्गाकडून नदी पात्राकडे जाणारे विकास योजनेतील रस्ते विकसित झाल्यास पोलीस विभागाला आणि प्रशासनाला एकेरी मार्ग नियोजन, गर्दी विकेंद्रीकरण व व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे.

तीर्थक्षेत्राला अनुषंगिक कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी देशपातळीवरील वास्तुविशारद, पुरातत्व शास्त्रज्ञ, अभियंत्यांच्या कल्पना स्वीकारून कामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुणे प्रादेशिक कार्यालयामार्फत संकल्पना स्पर्धा घेण्यात आली होती. त्यात सहभागी झालेल्या सल्लागारांचे सादरीकरण विभागीय आयुक्तांच्या तांत्रिक सल्लागार समिती समोर झाले. त्यातील तीन सल्लागारांनी या बैठकीत आराखड्याबाबत सादरीकरण केले.

वाराणसी येथील काशी विश्वनाथ देवस्थानच्या धर्तीवर पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांना सुविधा देतानाच परिसराचा विकास करण्यासाठीचा आराखडा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार प्रस्तावित आराखडा अंतिम करताना वारकरी संप्रदाय, मंदिर समिती, नागरिक, पंढरपूरातील लोकप्रतिनीधी यासर्वांशी चर्चा करून आराखडा करावा, असे मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

जे निवासी, व्यापारी, दुकानदार बाधित होणार आहेत त्यांना योग्य मोबदला देणे व योग्य ते पुनर्वसनाबाबतदेखील या बैठकीत चर्चा झाली.

# कोकण विभागीय आयुक्तांकडून ई-ऑफिस प्रणालीचा आढावा



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महसूल कार्यालयात येणारी सर्व प्रकरणे यापुढे ई-ऑफिस प्रणालीद्वारे नोंदविण्यात यावीत. संपूर्ण महसूल विभागात ई-ऑफिस प्रणाली १०० टक्के राबविण्यात येऊन प्रशासनात गतिमानता आणावी, अशा सूचना कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिल्या. कोकण विभागातील महसूल कार्यालयांमध्ये कार्यरत करण्यात आलेल्या ई-ऑफिस प्रणालीचा मंगळवारी (दि.६) आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आढावा घेतला.

प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि कागदविरहीत (पेपरलेस) होण्यासाठी राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली सुरू करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनातून कोकण विभागातील सर्व महसूल कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली कार्यरत करण्याचे काम वेगाने पूर्ण करण्यात आले आहे.


कोकण विभागातील महसूल कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली १०० टक्के कार्यरत झाल्याबद्दल डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सर्व महसूल यंत्रणेचे अभिनंदन केले. महसूल कार्यालयांमध्ये या प्रणालीचा वापर सुरू झाल्यामुळे शासकीय कामकाजात गती येणार, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहीत (पेपरलेस) होणार असल्याने कामकाजात अधिक सुलभता आणि पारदर्शकता येणार असल्याचे या वेळी आयुक्तांनी सांगितले.

ई-ऑफिसच्या वापरामुळे काही प्रकरणांची कागदपत्रे मोबाईलवरदेखील पाहता येणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक व योग्य वापर करून शासकीय कामकाज सुलभ करता येऊ शकते. या प्रणालीचा इतर विभागांनीदेखील अवलंब करावा, अशा सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या.

# रायगडात नऊ महिन्यांत एक हजार ९७५ कोटी मुद्रांक शुल्क जमा

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यात एप्रिल ते डिसेंबर २०२३ या नऊ महिन्यांत जिल्ह्यात एक लाख सहा हजार ४४४ दस्तांची नोंदणी करण्यात आली आहे. यातून तब्बल एक हजार ९७५ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क शासन जमा झाला आहे. गेल्या वर्षी रायगड जिल्ह्यासाठी दोन हजार १०० कोटींचे मुद्रांक शुक्ल उद्दीष्ट होते. प्रत्यक्षात दोन हजार ४५० कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क जमा झाला होता. या वर्षी तो तीन हजार कोटींपर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे.



कोरोनामुळे २०१९-२० आणि २०२०-२१ या आर्थिक वर्षात जमिनींचे व्यवहार थंडावले होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात आली होती. याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर, कर्जत, अलिबाग, पेण आणि रोहा तालुक्यात स्थावर मालमत्ता खरेदी विक्रीच्या व्यवहार वाढले आहेत.

चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर २०२३ या कालावधीत जिल्ह्यात तब्बाल एक लाख सहा हजार ४४४ दस्तांची नोंद करण्यात आली. यातून एक हजार ९७५ कोटींचा मुद्रांक शुल्क जमा झाला. म्हणजेच जवळपास दोन हजार कोटींचा मुद्रांक जमा झाला. डिसेंबर महिन्यात ११ हजार ६६८ दस्तांची नोंदणी झाली. यातून तब्बल २४९ कोटी सात लाखांचा मुद्रांक जमा झाला आहे.

## नेरूळ पोलीस स्टेशनमधून मुलीला पळविल्याने मोर्चा

**नवी मुंबई** : नेरूळ पोलीस स्टेशनमधून मुसलमान मुलाने हिंदु मुलीला पळवून नेल्याप्रकरणी सकल हिंदू समाजाने मंगळवारी (दि. ६) मोर्चा काढून पोलिसांचा निषेध केला. भाजपचे सतीश निकम म्हणाले की, नेरूळ से. १५ येथील मुलीला मुसलमान तरुणाने लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकवले होते. या प्रकरणी मुलीचे पालक तक्रार करण्यासाठी गेले होते, मात्र त्यांना बोलण्यात गुंतवून मुलीला मुसलमान तरुणाने पळवून नेले. वपोनि तानाजी भगत यांनी गुन्हा दाखल करून तपास पथक पाठवण्यात येतील, असे आश्वासन दिले.

# पुण्यात ३०० गुंडांची पोलीस आयुक्तालयात चौकशी

**पुणे : प्रतिनिधी**

जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील गुंड टोळ्यांचे म्होरक्यांची झाडाझडती घेण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले. त्यानुसार पोलीस आयुक्तालयात मंगळवारी (दि.६) गुंड गजानन मारणे, बाबा बोडके, निलेश घायवळ, सचिन पोटे यांच्यासह ३०० गुंडांची चौकशी करून त्यांना समज देण्यात आली.




अमितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तपदाची सूत्रे स्विकारल्यानंतर गुंडगिरीचा बिमोड करण्याचे आदेश दिले. त्यानुसार गुन्हे शाखेने शहरातील गुंडांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली.

मंगळवारी पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेतील गुंड गजानन मारणे, बाबा बोडके यांच्यासह विविध टोळ्यांच्या म्होरक्यांना बोलाविण्यात आले. गुंड टोळ्यांचे प्रमुख, त्यांच्या साथीदारांना रांगेत उभे करून त्यांची गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी चौकशी केली.

शहरातील दहा टोळ्यांचे प्रमुखांसह गुन्हेगारी क्षेत्रात पाऊल ठेवलेल्या २१ टोळ्यांच्या म्होरक्यांची पोलिसांकडून चौकशी करण्यात आली. पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर, सुनील तांबे यांनी गुंडांना समज दिली. गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी चौकशी केली.

पोलीस कोणाचे शत्रू नाहीत. आम्ही नागरिकांशी सुरक्षेशी बांधील आहेत, मात्र ज्यांना कायद्याचे पालन करायचे नसेल तर त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस आयुक्तांनी गुंडांना दिला होता. यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# पनवेलमधील भात गिरणीचे चित्र जहांगीर आर्ट गॅलरीत



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. पनवेलच्या वेगवगेळ्या ऐतिहासिक वस्तूंच्या छटा कागदावर जशाचा तशे उमटवणाऱ्या युवा चित्रकार केविन डायस याने काढलेली दोन चित्रांची निवड मुंबईत होणाऱ्या आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय वार्षिक कला प्रदर्शनात झाली आहे. पनवेलमधील १२० वर्षे जुन्या युसूफ भात गिरणीचे केविन डायसने गतवर्षी काढले होते. हे चित्र राष्ट्रीय वर्षी कला प्रदर्शनात झळकत आहे.

मुंबई फोर्ट येथे आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या १०६व्या राष्ट्रीय वार्षिक कलाप्रदर्शन सुरू आयोजित करण्यात आले आहे. खुला आणि विद्यार्थी गटात देशभरातून विद्यार्थी चित्र पाठवत असतात. चित्रकला क्षेत्रात नामांकित समजल्या जाणाऱ्या चित्रकला प्रदर्शनात पनवेलच्या केविन डायस याचे दोन चित्रांची निवड झाली आहे. एकेकाळी भाताचे कोठार असलेल्या शहरात अनेक मिल आहेत.

## कोकण विभागात मराठा आरक्षणाचे सर्वेक्षण १०० टक्के पूर्ण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महसूल यंत्रणेसोबत इतर विभागांच्या मदतीने कोकण विभागात मराठा आरक्षणाचे सर्वेक्षण १०० टक्के पूर्ण झाले आहे, अशी माहिती कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची मोहीम हाती घेतली होती. २३ जानेवारीपासून सुरू झालेल्या या मोहिमेत महसूल यंत्रणेसह इतर विभागांचे अधिकारी, कर्मचारी सहभागी होते. अंगणवाडी सेविका, माध्यमिक आणि प्राथमिक शाळेचे शिक्षक, महापालिकेचे कर्मचारी असे जवळपास साडेचार लाख प्रगणक महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात या मोहिमेसाठी राज्यभर काम करीत होते, तर २००हून अधिक डेटाबेस सेंटर सुरू होते. सर्वेक्षणासाठी खास सॉफ्टवेअरही तयार करण्यात आले होते. २ फेब्रुवारीला मध्यरात्री १२ वाजता हे सर्वेक्षण संपले असून कोकण विभागात हे सर्वेक्षण १०० टक्के पूर्ण झाले आहे. या सर्वेक्षणात संकलित केलेली माहिती मागासवर्ग आयोगाकडे सादर करण्यात येईल. यावरून अहवाल तयार केला जाईल आणि तो शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

# चिरनेर येथे आयुर्वेदिक शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

■ नाडी परीक्षणाद्वारे रुग्णांची तपासणी

फिलान हर्बो मेडिक्स प्रा. लिमिटेडच्या वतीने चिरनेर येथे आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. नजम अली कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरात नाडी परीक्षणाद्वारे डॉ. नजम अली कादरी यांनी आजारांचे निदान करून रुग्णांना मार्गदर्शन केले, आणि धीर दिला. तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीच्या सभागृहात रविवारी (दि. ४) या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरास परिसरातील नागरिक, अबाल वृद्ध, महिला, विद्यार्थी या सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेषतः या आयुर्वेदिक शिबिरात थायरॉईड, मुतखडा, मुळव्याध, मधुमेह, कावीळ, दमा, सर्दी, खोकला, सांधेदुखी, गुडघे दुखी, वातरोग, चर्मरोग, पोट वाढणे, स्त्रियांचे आजार, भूक न लागणे, अपचन, केस गळणे, डोकेदुखी, दंत विकार, अल्सर, गॅस, पित्त, जळजळ, अशक्तपणा, वजन वाढविणे आदी रोगांची तपासणी करण्यात आली. या वेळी स्त्रियांच्या आरोग्याविषयी माहिती आणि व्यंधत्वाविषयी तपासणी तसेच त्यावरील उपाय योजनांविषयी डॉ. कादरी यांनी मार्गदर्शन करून, त्यांच्या रुग्णांना आलेले अनुभव सांगितले.

## पळस येथे विधवा महिलांचा हळदीकुंकू लावून सन्मान

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील पळस येथील मुक्ताई व कृष्णाई ग्रामसंघ (बचत गट) यांच्या वतीने पळस ग्रामपंचायत कार्यलयात सोमवारी (दि.५) महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या हळदीकुंकू समारंभाला गावातील महिला वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या समारंभात सरपंच निष्ठा विचारे यांच्या हस्ते विधवा महिलांना हळदीकुंकू लावून सन्मान करण्यात आला.

या वेळी उपसरपंच चंद्रकांत भालेकर, पं. स. च्या बचत गट प्रमुख नेहा पाटील, ग्रामसेविका कांचन जावळे-राऊत, सदस्य उषा साळुंखे, सुरेखा नाईक, सीआरपी हेमा डाकी, बँक सखी वर्षा जांबेकर, बचत गट अध्यक्षा अंजली दुर्गावले, सचिव हर्षदा शिंदे, खजिनदार शोभा कदम, महिला उपस्थित होत्या.

पान १ वरुन

## शेतजमिनीचा अकृषक वापर करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बिनशेती शोध मोहिमेंतर्गत अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. यात अलिबागमध्ये सात कोटी ५९ लाख रुपये, पेणमध्ये पाच कोटी ४५ लाख, खालापूरमध्ये पाच कोटी ३५ लाख, पनवेलमध्ये तीन कोटी २४ लाख, उरणमध्ये तीन कोटी २० लाख, कर्जतमध्ये तीन कोटी एक लाख, माणगावामध्ये दोन कोटी ९१ लाख, श्रीवर्धनमध्ये एक कोटी ५२ लाख, सुधागड तालुक्यात एक कोटी सात लाख असा नऊ तालुक्यांत कोट्यवधी रुपयांमध्ये, तर उर्वरित सहा तालुक्यांमध्ये लाखोंचा दंड आकारण्यात आला आहे.

# कमळ महिला पतपेढीच्या हळदीकुंकू समारंभाला प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल संस्था महिलांसाठी नेहमीच विविध उपक्रम उत्साहाने राबवित असते. या वर्षीही मकर संक्रांती निमित्त हळदीकुंकू समारंभ कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी पनवेल कर्मचारी प्रशिक्षण केंद्र, पहिला मजला, जय भारत नाका, पनवेल येथे आयोजित करण्यात आला.



समारंभाच्या सुरवातीला संस्थेच्या संचालिका पूर्वा खेडेकर यांनी हळदीकुंकू समारंभासाठी आलेल्या सर्व महिला सभासदांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविकेत हळदीकुंकू समारंभाची महती याबाबत महिलांना मार्गदर्शन केले. त्यानंतर संस्थेच्या संचालिका मनिषा विसपूते यांनी संस्थेबद्दलची माहिती तसेच संस्थेने सुरू केलेल्या नवीन विशेष ठेव योजनेबाबत अतिशय प्रभावीपणे माहिती उपस्थित महिला सभासदांना सांगितली. त्याला महिला सभासदांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

संस्थेच्या संचालिका निर्मला म्हात्रे यांनी हळदीकुंकू समारंभावर मार्गदर्शन करून महिलांनी आपल्या संस्थेच्या कार्यक्रमात सहभाग घ्यावा तसेच हळदीकुंकू समारंभाबाबत माहिती सांगितली. त्यानंतर संचालिकांनी उपस्थित महिलांना हळदीकुंकू, वाण दिले. या वेळी जवळ जवळ ३०० महिला सभासदांनी उपस्थिती दर्शविली. मोठ्या उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात हळदीकुंकू समारंभ सोहळा झाला.

महिलांची उपस्थिती बघता खरोखरच महिलांना त्यांच्या पतसंस्थेबद्दल वाटत असलेले ममत्व, वाटत असलेला अभिमान आणि संस्थेच्या दैनंदिन कामकाजात असलेला सहभाग दिसून येत होता.

कार्यक्रमाच्या वेळी संस्थेच्या अध्यक्षा मालती आंग्रे, संस्थेच्या संचालिका अर्चना कुळकर्णी, चित्रा मानकामे, सुषमा जांभळे तसेच संस्थेच्या महिला कर्मचारी वर्गाने उत्साहाने भाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.



# पोलीस मन पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पोलीस खात्यातील सेवेत लाभलेल्या अनुभवांचा आकृतीबंध असलेल्या पोलीस मन या अजित देशमुख लिखित पुस्तकाचे प्रकाशन रविवारी (दि. ४) राज्याचे माजी पोलीस महासंचालक शिवानंदन यांच्या हस्ते झाले.

या वेळी व्यासपीठावर पुस्तकाचे लेखक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी अजित देशमुख, साहित्यिक लेखिका धनश्री लेले कवी प्रमोद जोशी व प्रकाशक नितीन हिरवे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आणि पुस्तकप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, प्रत्यक्ष प्रकाशन होण्यापूर्वीच या पुस्तकाच्या सर्व प्रती संपून दुसऱ्या आवृत्तीची घोषणा प्रकाशनाच्या दिवशीच होणे हे या पुस्तकाचे यश आणि वैशिष्ठ्य असल्याचे, प्रकाशक नितीन हिरवे यांनी नमूद केले.

# रस्ता सुरक्षेला प्राधान्य!

## गव्हाण विद्यालयात जनजागृतीपर कार्यक्रम | वक्तृत्व व चित्रकला स्पर्धाही उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना' निमित्त वक्तृत्व, चित्रकला व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. सर्व स्पर्धांना विद्यालयातील स्पर्धक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कला विभागप्रमुख कला शिक्षक गणेश भोईर, वक्तृत्व स्पर्धा विभागप्रमुख सागर रंधवे व सहायक उज्ज्वला म्हात्रे तसेच सर्व वर्गशिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वाहतूक शाखेचे मयूर पाटील यांनीही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



रस्ता सुरक्षा या विषयावर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अण्णा शिंदे यांचे हस्ते झाले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, वाहतूक शाखेचे मयूर पाटील, विद्यालयाचे वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, क्रीडाशिक्षक जयराम ठाकूर आदी उपस्थित होते.

पाचवी ते दहावीचे अनेक विद्यार्थी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेतून सोमवारी (दि.५) झालेल्या या स्पर्धेमध्ये पाचवी ते दहावी दोन गटातील विद्यार्थ्यांनी रस्ते सुरक्षाचे महत्त्व पटवून देणारी माहिती भाषणातून सांगितली.

या वेळी विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधून भाषणे केली. न्हावा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अण्णा शिंदे यांनी विजेत्या विद्यार्थी स्पर्धकांना न्हावा शेवा व पोलीस ठाण्याच्या वतीने प्रशस्तीपत्र आणि बक्षीसे देण्यात येणार असल्याचे सांगितले. चित्रकला स्पर्धेचे परीक्षण विद्यालयाचे कलाशिक्षक गणेश भोईर यांनी तर वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख हर्षाला पाटील व वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे यांनी परीक्षण केले.

**पालकांनी आपल्या पाल्यांना सजग करण्याचे आवाहन**

प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी न्हावा पोलीस स्टेशनच्या वतीने आयोजित केलेल्या या विविध स्पर्धेच्या आयोजनाची भूमिका विषद करून विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षेविषयी स्वतः जागृत राहून आपल्या पालकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

# कामोठ्यात मद्यधुंद चालकाने तीन जणांना चिरडले; दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

दारू पिऊन स्कूल व्हॅन चालवणाऱ्या वाहनचालकाने दिलेल्या धडकेत व्हॅनखाली चिरडून एका नऊ वर्षीय मुलासह ५० वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना कामोठे वसाहतीमधील जुई कामोठे गावाच्या प्रवेशद्वारासमोर घडली. या अपघातात एक व्यक्तीदेखील जखमी झाला आहे. या प्रकरणी कामोठे पोलिसांनी मद्यधुंदचालक ओमकार विलास चव्हाण याला अटक केली आहे.

आर्यन दत्ता साळवे (वय ९), मंगल बाळू रोकडे (वय ५०) असे मृत झालेल्या व्यक्तींची नाव आहेत. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात वाहन चालकावर कलम ३०४ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगल रोकडे तसेच आर्यन साळवे आणि त्याचे कुटूंब तसेच इतर कुटूंब हे कामोठे वसाहतीमधील जुई कामोठे गावाच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारील फुटपाथ तसेच मोकळ्या जागेत राहत होते. हे सगळे कुटूंब दिवसभर आपले काम करून घरी विसाव्यासाठी आले होते, मात्र हा दिवस काळरात्र घेऊन आला आहे असे त्यांना माहीत नव्हते.

नेहमीच्या दिनचर्येनुसार साळवे, रोकडे कुटूंब जेवणल्यानंतर आपल्या राहत्या झोपड्याच्या बाहेर गप्पा मारत बसले होते. तर काहीजण हे रस्त्यावर फेरफटका मारत होते. याच वेळी दारू पिऊन बेबूंद अवस्थेमध्ये स्कूल व्हॅनचालक स्वतःच्या



ताब्यात असलेली एमएच ४६ बीबी ३४१८ ही स्कूल व्हॅन घेऊन कामोठे वसाहतीकडे निघाला होता. तो चालक दारूच्या नशेत असल्याने त्याचा वाहनावरील ताबा सुटला आणि ही व्हॅन रस्ता सोडून रस्त्यावरून चालणाऱ्यांना जाऊन धडकली. या वेळी रत्यावरून चालणारा एक ९ वर्षीय युवक आर्यन आणि ५० वर्षीय महिला मंगल तसेच अन्य एका महिलेला गाडीने जोरात धडक दिली. ही धडक एवढी भयानक होती की, आर्यन या गाडीच्या खाली आल्याची माहिती नातेवाईकांनी दिली तर, मंगल ही गाडीच्या धडकेने लांब फेकली गेली. यामध्ये आर्यनचा जागेवरच मृत्यू झाला. मंगल यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे, तर नधिया साळवे (वय २०) हा जखमी झाला आहे.

ही घटना घडल्यानंतर जखमींना तत्काळ एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले, मात्र आर्यनचा जागेवरच मृत्यू झाल्याचे घोषित केल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. तर मंगल ही उपचारादरम्यान मृत झाल्याचे सांगितले. या घटनेची सगळी माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोचून वाहनचालकाला ताब्यात घेतले आणि चौकशी सुरू केली आहे. या वाहन चालकांवर कलम ३०४ (अ) नुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

**अपघाताची तीव्रता भयानक**

रस्त्यावरील पोलदेखील वाकला जुई कामोठ्याच्या प्रवेशद्वाराजवळ झालेला या अपघाताची तीव्रता एवढी भयानक होती की, अपघाताला जबाबदार असलेली स्कूल व्हॅन ही रस्त्यावरील पोलला जाऊन आढळली आणि हा पोल चक्क वाकला आहे, हा पोल रस्त्या शेजारी नसता तर वाहन अपघातात मृत पावलेल्याची संख्या अधिक असती, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

## निवडक

### वावंजे गावात घरफोडी

**पनवेल :** एका बंद घरात केलेल्या घरफोडीत हजारो रुपये किमतीचा ऐवज चोरी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील वावंजे गावाच्या हद्दीत घडली आहे. बंद असलेल्या घराच्या दरवाज्याचे लॉक अज्ञात चोरट्याने कश्याने तरी उघडून त्याद्वारे आत प्रवेश करून घरातील विविध वस्तू, कम्प्यूटर, प्रिंटर, लोखंडी प्लेट असा मिळून जवळपास ५४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ड्रेनेज लाईनचा विषय मार्गी



**पनवेल :** शहरातील प्रभाग क्र १८ मधील शांताबाई गडगे मार्गावरील मलनिसरण करणारी लाईन तुटलेल्यामुळे परिसरातील सोसायट्यांना त्रास होऊ लागला होता. पाईप तुटल्यामुळे मलनिस्सारण होत नव्हते, त्यामुळें दुर्गंधी युक्त पाणी उलट फिरत असल्यामुळे तळमजल्यावरील राहणाऱ्या लोकांनी जास्त त्रास जाणवत होता. याबाबत सोसायटींच्या रहिवाशांनी माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांना विषयाची माहिती दिली. त्यांनी महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करून याविषयात पत्र दिले व ड्रेनेज लाईनचा विषय मार्गी लावला.

### अबॅकस स्पर्धेत ईश्वरी भालेरावचे यश

**कामोठे :** एडुकेरे आणि रीसर्च इन्स्टिट्यूटतर्फे रविवारी



(दि. ४) कराडी समाज हॉल कामोठे येथे अबॅकसची राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवीन पनवेल शाखेतील ईश्वरी सचिन भालेराव हिने भाग घेऊन झेड कॅटेगरीमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. ईश्वरी भालेराव ही पॉवरलिफ्टिंग रायगड सहसचिव सचिन भालेराव यांची कन्या असून महात्मा इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता चौथी ए मध्ये आहे. अतिशय मेहनत करून तिने. कमी अवधीत हे यश संपादन केले. त्यामुळे तिचे आजोबा विठ्ठल खंडू भालेराव, आजी कांताबाई विठ्ठल भालेराव, आई हर्षदा सचिन भालेराव, काका तुषार भालेराव, काकी अनुजा तुषार भालेराव आदींनी आनंद व्यक्त करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सिडकोची तळोजा, द्रोणागिरी नोडमधील घरे विक्रीसाठी उपलब्ध

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको महामंडळातर्फे ७५ व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहूर्तावर २६ जानेवारी २०२४ रोजी महागृहनिर्माण योजना जानेवारी – २०२४ चा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत तळोज्यातील नवी मुंबई मेट्रो आणि द्रोणागिरी नोडशी जोडणाऱ्या भारतातील सर्वांत लांब सागरी सेतू एमटीएचएलच्या सान्निध्यात ३,३२२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या महागृहनिर्माण योजनेच्या ऑनलाईन अर्ज नोंदणीस २६ जानेवारी २०२४ पासून सुरुवात झाली आहे.

सिडको महामंडळातर्फे विविध आर्थिक स्तरांतील नागरिकांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्याकरिता सातत्याने गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. परवडणाऱ्या दरातील सदनिकांसह दर्जेदार बांधकाम, आधुनिक सुविधांनी परिपूर्ण व नवी मुंबईच्या विकसित नोडमधील गृहसंकुले, या वैशिष्ट्यांमुळे सिडकोच्या आजवरच्या सर्व गृहनिर्माण योजना लोकप्रिय ठरल्या आहेत.

३,३२२ सदनिकांपैकी द्रोणागिरी नोड येथील ६१ व तळोजा नोड येथील २५१ याप्रमाणे ३१२ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध आहेत, तर द्रोणागिरी येथील ३७४ व तळोजा येथील २,६३६ याप्रमाणे ३,०१० सदनिका या सर्वसाधारण घटकांसाठी उपलब्ध आहेत. योजनेच्या ऑनलाईन नोंदणी व सविस्तर माहितीकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नोंदणी सहाय्यासाठी नागरीकांनी ७०६५४५४४५४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.




**तळोजा आणि द्रोणागिरी नोड्समध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व सर्वसाधारण घटकांतील नागरिकांसाठी ३,३२२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे मी आवाहन करतो.**
**–अनिल डिग्गीकर, उपाध्यक्ष, सिडको**

महागृहनिर्माण योजना जानेवारी – २०२४ करीता अर्ज नोंदणी ते सोडती दरम्यानच्या सर्व प्रक्रिया या सुलभ व पारदर्शक ऑनलाइन पद्धतीने पार पडणार असून २६ जानेवारी २०२४ रोजी ऑनलाइन नोंदणीस सुरुवात झाली आहे. योजनेची संगणकीय सोडत १९ एप्रिल २०२४ रोजी काढण्यात येणार आहे.

नवी मुंबई मेट्रोजवळील तळोजा आणि भारतातील सर्वात लांब सी लिंक MTHL ला जोडणाऱ्या द्रोणागिरी नोड येथील सिडको महागृहनिर्माण योजना जानेवारी २०२४मध्ये नोंदणी करून घर खरेदी करण्याच्या या सुवर्ण संधीचा लाभ जास्तीत जास्त नागरीकांनी घ्यावा, असे आवाहन सिडकोतर्फे नागरिकांना करण्यात येत आहे.



**पनवेल : भाजप माथाडी, ट्रान्सपोर्ट, सुरक्षारक्षक आणि जनरल कामगार युनियनचे उपाध्यक्ष संजय भगत यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी भाजप माथाडी, ट्रान्सपोर्ट, सुरक्षारक्षक आणि जनरल कामगार युनियनचे उपाध्यक्ष संजय भगत यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, पनवेल अध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, खारघर अध्यक्ष नितेश पाटील, देवांशू प्रभाळे, कोमल कोळी, सुयोग वाफारे, अजय मोरे, नितेश घुगे, अश्विन सातपुते आदी उपस्थित होते.**

# शिरढोणमध्ये भाजपतर्फे हळदीकुंकू व खेळ पैठणीचा; महिलांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मकर संक्रांतीच्या निमित्ताने हळदीकुंकू कार्यक्रमाचे विशेष आयोजन केले जाते. मकरसंक्रांतीपासून रथसप्तमी पर्यंत हा सोहळा आयोजित केला जातो. त्यानुसार भारतीय जनता पक्ष महिला मंडळ शिरढोण यांच्या वतीने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन सोमवारी (दि. ५) करण्यात आले होते. या वेळी महिलांना हळदीकुंकू आणि वाण म्हणजेच भेटवस्तू देण्यात आले.



हळदीकुंकू समारंभानिमित्त पैठणी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम क्रमांक अनुजा घरत, द्वितीय क्रमांक सपना घरत व तृतीय क्रमांक निमिषा मुकादम यांनी पटकावला. या वेळी भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल शहर महिला मोर्चा अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, नीता माळी, कुंदा मेंगडे, जोत्स्ना माळी, रेश्मा गोपी, विना ठोकल, सपना घरत, प्रणिता मुकादम, रसिका वाकडीकर, जयश्री करणेकर, विजयश्री गोपी, पूनम मुकादम, मिनीषा मुकादम, निकिता चौधरी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : प्रजापती ब्रम्हकुमारीच्या वतीने शहरातील हुतात्मा स्मारक, छत्रपती शिवाजी चौक येथे हळदीकूंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा प्रशांत ठाकूर, तारादीदी, सपना पाटील, कविता पाटील, अरुणा पाटील, सुवर्णा मागी, आशा तलोजकर, ॲड. दिपाली बांद्रे आदी उपस्थित होत्या.**

# प्रश्नमंजुषा स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्रम्हपुत्रा कॅन्सर केअर सोसायटी मुंबई यांच्यातर्फे आंतर शालेय आरोग्य विषयक प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नवीन पनवेल सीकेटी इंग्रजी माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

स्पर्धेसाठी पनवेल परिसरातील नामांकित शाळा सहभागी झाल्या होत्या. विजेत्यांसाठी रोख रक्कम व चषक अशी बक्षिसे



ठेवण्यात आली होती. कॅन्सर विषय जनजागृती करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयातील ५६ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी विजेत्या तीन विद्यार्थ्यांना ९,००० रुपये आणि चषक असे प्रथम क्रमांकाचे बक्षिस प्राप्त झाले.

विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण आदींनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# समाजकंटकांना दणका

राज्याचा गृहमंत्री सजग आणि कार्यक्षम असला की सुरक्षा यंत्रणा भराभर हलू लागतात. विरोधकांच्या आरोपांना उत्तरे देत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीने चोख उत्तर देण्याचे काम गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पार पाडले, कारण ते सजग आणि कार्यक्षम आहेत म्हणूनच. उल्हासनगर येथील पोलीस ठाण्यात झालेल्या गोळीबाराच्या दुर्दैवी प्रकारानंतर विरोधकांनी गृहमंत्र्यांवर टीकेची झोड उठवली होती.

**उल्हासनगर येथील पोलीस ठाण्यातील गोळीबाराच्या दुर्दैवी घटनेनंतर, सत्ताधारी पक्षाचाच आमदार पोलीस ठाण्यात बेधडक गोळीबार करतो याला जबाबदार गृहमंत्रीच आहेत अशा प्रकारचे बेफाम आरोप विरोधकांनी केले. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी तर गृहमंत्री कुठे लापता आहेत असा हेटाळणीवजा सवाल केला. वास्तविक त्यावेळी गृहमंत्री काय करत होते, याची माहिती त्यांनी घेतली असती तर बरे झाले असते. त्यावेळी फडणवीस हे चंद्रपूर, गडचिरोली भागात नक्षलवाद्यांच्या कारवायांना आळा कसा घालता येईल याची आखणी करत होते. तेदेखील प्रत्यक्ष तेथे उपस्थित राहून. उल्हासनगर येथील प्रकारानंतर विरोधीपक्षाच्या काही नेत्यांनी गृहमंत्र्यांचा राजीनामा मागितला. खरे तर तशी काही गरज नव्हती, परंतु विरोधासाठी विरोध करणे हे आपले कामच आहे अशी विरोधकांची समजूत झालेली दिसते. उल्हासनगर येथील प्रकाराबद्दल पोलिस योग्य ती कारवाई करत आहेत आणि कायदा त्याचे काम करेलच. हे प्रकरण क्षमते न क्षमते तोच, पुण्यातील कुणा गुंडाचे मंत्रालयातील 'दर्शन' समाजमाध्यमाद्वारे बाहेर आले. मंत्रालयामध्ये अनेक प्रकारची माणसे येत असतात. त्यामध्ये उद्योजक, सामान्यजन किंवा निरलसपणे जनसेवा करणारेही असतात, तसेच जामिनावर बाहेर असलेले संशयित आरोपी किंवा गुन्हेगारदेखील असू शकतात. या सगळ्यांनाच नेते व्यक्तिश: ओळखत असतात असे मानणे हास्यास्पद आहे. एखाद्या नेत्याने नामचीन गुंडाला आवर्जून बोलावून घेतले आणि त्याच्यासोबत आनंदाने छायाचित्रे काढून घेतली तर ते निश्चितच आक्षेपार्ह आहे, परंतु विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मात्र संधी साधून या गुंडाच्या 'रील'वरूनही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांवर तोंडसुख घेतले. अर्थात भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रवीण दरेकर यांनी त्यांना चोख उत्तर दिले आहे हा भाग वेगळा. गुंडांशी संबंध असल्याच्या आरोपावरून सत्ताधाऱ्यांच्या विरोधात टीकेची झोड उठलेली असतानाच पुण्यात एक विशेष घटना घडली. त्याकडे सर्वांचे लक्ष वेधावे लागेल. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, धनकवडी आदी भागांतील सुमारे ३०० नामचीन गुंडांना पोलिस आयुक्तालयात बोलावून घेण्यात आले. पुण्याचे आयुक्त अमितेश कुमार यांनी या सर्व गुंडांना आयुक्तालयाच्या पटांगणात उभे करून त्यांची चक्क ओळख परेड केली. यापुढे गुन्हे करू नका आणि समाजमाध्यमांवर रील्स टाकण्याचा उद्योगही करू नका अशी स्पष्ट तंबी त्यांना देण्यात आली. या नामचीन गुन्हेगारांची पार्श्वभूमी अर्थातच गंभीर गुन्ह्यांनी भरलेली आहे. सध्या ते जामिनावर किंवा अन्य कारणांमुळे बाहेर असले तरी पोलिसांची करडी नजर त्यांच्यावर आहे, हाच संदेश या ओळख परेडमधून देण्यात आला. गृहमंत्र्यांच्या सजगतेशिवाय पोलीस अधिकारी अशी कठोर पावले उचलणे कठीण असते. गुन्हेगारांना माफी नाही हा कडक संदेश देण्यात आल्यामुळे विरोधकांची तोंडे आता तरी बंद होतील, अशी अपेक्षा आहे. समाजकंटकांना हा दणका मिळाला हे चांगलेच झाले याचे परिणाम दूरगामी असतील यात शंका नाही.**

# ज्येष्ठांसाठीच्या योजना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता



ज्येष्ठ नागरिक दिन १ ऑक्टोबरला दरवर्षी साजरा केला जातो. 'कोई बिते हुए, मेरे दिन मुझे लौटा दो' म्हणणाऱ्या या ज्येष्ठांना सहानभूती व्यक्त केली जाते. शासन आपल्या स्तरावर काही योजना जाहीर करून आपला सहभाग दाखवून देते, पण त्यांचा लाभ ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहचत नाही. ज्येष्ठांच्या प्रश्नाबाबत शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उदासिनताच ह्याला जबाबदार असल्याचे दिसून येते.

आपण काही दिवसापूर्वी वर्तमानपत्रात बातम्या वाचल्या मुलगा परदेशात नोकरीला वडील मुंबईत, अलिशान ब्लॉकमध्ये त्यांचा मृत्यू होऊन दोन-तीन महीने झाले तरी कोणालाच समजले नाही. एवढेच कशाला काही दिवसांपूर्वी ठाण्याजवळ एका खेड्यात राहणाऱ्या आपल्या वडिलांचा मृत्यू झाला तर देशातच असणारी मुलगी गावकऱ्यांना कळवते तुम्ही सगळे उरकून घ्या मला व्हिडिओ पाठवा. आपले संस्कार कोठे तरी कमी पडतात असे यावरून वाटायला लागते. बहुदा हा कॉन्व्हेंट शिक्षणाचा परिणाम असावा. कारण पुण्याला माझ्याबरोबर महाविद्यालयाच्या हॉस्टलमध्ये राहणाऱ्या कॉन्व्हेंटमधून आलेल्या मुलांना घराबद्दल, बहीण-भाऊ किवा आपल्या आई - वडिलांबद्दल अस्था, आपुलकी कधी जाणवलीच नाही जी इतर मुलांच्यात असायची. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणारी आजची पिढी आपली संस्कृती विसरायला लागली आहे. त्यामुळेच वृध्दाश्रमांची संख्या वाढत आहे.

आपल्या वृध्द आई - वडिलांकडे दुर्लक्ष करणारी हीच पिढी आज आपल्या वडिलांनी कष्ट करून मिळवलेल्या प्रॉपर्टीसाठी किवा त्यांच्या जमिनीच्या तुकड्यासाठी आपसात भांडताना दिसते. प्रसंगी त्यावरून खून करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. ज्या वडिलांनी कष्ट करून प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन यांना शिक्षण दिले. मोठे केले. त्यांना मात्र गरज असताना वृध्दाश्रमात ठेऊन हात झटकतात त्याबद्दल त्यांना ना खंत, ना खेद. त्यांच्या अनुभवाचा फायदा घेण्याचा प्रयत्न कधी केलाच जात नाही. अशा वेळी पनवेल तालुक्यातील दातार इन्स्टिट्यूटचे संजय दातार दरवर्षी रायगड जिल्ह्यातील वृध्दाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना आपल्या दातार इन्स्टिट्यूटमध्ये आणून त्यांचे पारंपरिक पध्दतीने स्वागत करून त्यांच्या सोबत सहकुटुंब एक दिवस घालवतात त्यांच्या सोबत खेळ, गाणी अशा कार्यक्रमानंतर जेवण करतात त्यावेळी संजय दातारांसारखा माणूस आपली संस्कृती टिकून असल्याची खात्री पटवतो.

**खबरबात**

**नितीन देशमुख**



पनवेलमध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक संघ आहेत. आपल्या परिसरातील समस्या सोडवण्यासाठी आपली वेदना, दु:ख विसरून ते काम करीत असताना दिसतात. नवीन पनवेल मधील अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघ हा त्यापैकीच एक. या संघाचे १०० पेक्षा जास्त सदस्य आहेत. ते पनवेल स्टेशनच्या पूर्वेला असलेल्या कट्ट्यावर रोज सकाळ - संध्याकाळ एकत्र येत असतात. यामध्ये विक्रीकर, रेल्वे, शिक्षण, पुरवठा अशा विविध शासकीय खात्यातून, बँक, खासगी क्षेत्र, कामगार संघटना अशा क्षेत्रातून निवृत्त झालेली अनुभवी माणसे आहेत.

आपल्या सोसायटीतील विजेचा किंवा पाण्याचा प्रश्न असो नाही तर रेल्वे किवा एन.एम.एम.टी.च्या बसचा प्रश्न तो सोडवण्यासाठी धडपडताना दिसतात. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयात फेऱ्या मारीत असतात. तो प्रश्न सूटल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद पाहण्यासारखा असतो. यामधील अनेक प्रश्न सुटले नाही म्हणून यांचे काही अडणार नसते तर आजच्या तरुण पिढीला आपल्याला भेडसावणारे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ नसतो त्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम हे करीत असतात. अनेक वेळा येथून प्रवास करणाऱ्या महिला त्यांचे वाहतूकीविषयी प्रश्न यांना सांगतात हे त्यासाठी पत्रव्यवहार करून कार्यालयात फेर्या मारून ते सोडवत असतात पण त्याबद्द्ल कोणी त्यांचे आभार मानताना कधी दिसत नाही, पण गाडी बंद झाली की पुन्हा तक्रार करायला मात्र येतात. ज्येष्ठ महिला ही आपल्यावर नातेवाईकांकडून झालेल्या अन्यायाला येथे येऊन वाचा फोडतात. पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षा रोपण करून त्यांची जोपासना करण्यासाठी हे धडपडत असतात

आपल्या राज्यात ज्येष्ठ नागरीकांसाठी शासनाने अखर्चीक धोरण जाहीर केले. त्याबाबत चर्चा करण्यासाठी तत्कालीन सामाजिक न्याय मंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीस केवळ तीन खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्या बैठकीत दिलेलेल्या आदेशांची फक्त गृह खात्यानेच दखल घेतल्याचे दिसून आले. या बैठकीत ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठांना मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम १५०० रुपये करावी, त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळावी या दृष्टीने पाऊले उचलावीत. २००७च्या कुटुंब कायद्याची कडक अमलबजावणी करण्यात यावी. अमलबाजवणी न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी अशी मागणी ज्येष्ठांकडून करण्यात आली होती. त्यावर चर्चा करण्यात आली, पण सर्वाधिक प्रश्न एसटी आणि आरोग्य या विभागाशी निगडीत असताना त्या खात्याचे अधिकारी उपस्थित नव्हते.


या बैठकीत सामाजिक न्याय मंत्र्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद यांनी आपल्या शाळा, उद्याने आठवड्यातून एकदा विनामूल्य उपलब्ध करून द्याव्यात असे सूचित केले होते. त्यांच्यावर कुटुंबातून होणाऱ्या अत्याचारात वाढ होत असल्याने कुटुंबात त्यांचा सन्मान राखावा. यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात संस्कारक्षम गोष्टींचा समावेश करण्याची सूचना शालेय विभागाला देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. राष्ट्रीय सण, उत्सवाना तज्ञ ज्येष्ठ नागरिकांची व्याख्याने आयोजित करावीत, अशी सूचना समाजकल्याण विभागाला देण्यात आली. मंत्रालयात ज्येष्ठांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी उपसचिव दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्याचे ठरले, पण नंतर अधिकाऱ्यांनी त्याची अंमलबाजवणी करण्यासाठी कोणतीही पाऊले उचलेली दिसत नाहीत.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल क्रोमवरील पासवर्ड असा करा डिलीट व मॅनेज

जर तुम्ही गुगल क्रोम वापरत असाल तर त्यातील पासवर्ड मॅनेजर फीचरचा वापर करणेदेखील तुम्हाला जमले पाहिजे.



यामुळे पासवर्ड विसरण्याची भीती राहत नाही.

गुगल क्रोम जगातील सर्वांत लोकप्रिय इंटरनेट ब्राउजर्स पैकी एक आहे आणि याचा वापर कोट्यवधी लोक करतात. यात ब्राउजरमध्ये खास Password Autofill फीचर मिळते, ज्यामुळे तुमचे पासवर्ड सेव्ह करता येतात आणि वारंवार पासवर्ड एंटर करण्याची झंझट राहत नाही. परंतु बऱ्याचदा चुकून नको असलेले पासवर्ड सेव्ह होतात किंवा दुसऱ्यांच्या डिव्हाइसवर तुम्ही लॉगिन करत असाल तर तिथे पासवर्ड सेव्ह होतो. किंवा ऑटो सेव्ह पासवर्ड ऑन असेल तर सर्वच पासवर्ड सेव्ह होतात. अशावेळी तुम्ही हवे तेव्हा कोणताही सेव्ह पासवर्ड अपडेट किंवा डिलीट करू शकता.

क्रोममध्ये पासवर्ड्स सेव्ह केल्यावर युजर्सना कोणत्याही प्रकारचा डेटा लीक झाल्यावर पासवर्ड बदलण्याची चेतावणी दिली जाते. तसेच एखादा पासवर्ड कमजोर असल्यासदेखील युजर्सना पासवर्ड बदलण्यास सांगितले जाते. चला जाणून घेऊया तुम्ही कशाप्रकारे गुगल क्रोममध्ये पासवर्ड मॅनेजर वापरू शकता.

**या स्टेप्स फॉलो करून पाहा सेव्ह केलेला पासवर्ड**

सर्वप्रथम तुमच्या फोन किंवा लॅपटॉपमध्ये Chrome ब्राउजर ओपन करा. त्यानंतर टॉप राइट कॉर्नरवर दिसणाऱ्या तीन डॉट्सवर टॅप किंवा क्लिक करा. पुढे ड्रॉप-डाउन मेन्यू मधून Settings मध्ये जा. इथे तुम्हाला एक Passwords सेक्शन मिळेल, त्यावर टॅप करून तुम्ही सेव्ह केलेले पासवर्ड्स पाहू शकता. लक्षात घ्या इथे तेच पासवर्ड दिसतील जे तुम्ही स्वतःहून सेव्ह केले असतील किंवा चुकून सेव्ह झाले असतील. तसेच जर तुम्ही ऑटो सेव्ह ऑप्शन ऑन केला असेल तर सर्वच पासवर्ड सेव्ह झालेले असतील.

**अशा प्रकारे मॅनेज करा पासवर्ड**

पासवर्ड मॅनेजरमध्ये तुमचे पासवर्ड्स ऑटोसेवचा ऑप्शन ऑफ किंवा ऑन करण्याचा पर्यायदेखील मिळेल.

तसेच इथून तुम्ही ऑटो साइन-इनदेखील ऑफ करू शकता.

तुम्हाला एखाद्या वेबसाइटचा पासवर्ड क्रोममधून डिलीट करण्याचादेखील ऑप्शन इथेच मिळेल.

लक्षात असू द्या पासवर्ड्स पाहण्यापूर्वी तुम्हाला गुगल अकाऊंटचा पासवर्ड टाकावा लागू शकतो, किंवा तुमच्या डिव्हाइसचा पासवर्डदेखील विचारला जाऊ शकतो. इतर कोणीही पासवर्ड ॲक्सेस करू नये म्हणून ही सोय करण्यात आलेली आहे.

# फिरत्या रंगमंचाची न्यारी कहाणी

मराठी रंगभूमीवर इतिहास घडवणाऱ्या 'तो मी नव्हेच' या नाटकात पहिल्यांदाच फिरता रंगमंच वापरला गेला. तत्पूर्वी भारतीय रंगभूमीवर कधीच तसा प्रयोग झाला नव्हता. या अनोख्या प्रयोगाला आज (७ फेब्रुवारी १९६५) ५८ वर्षं पूर्ण होत आहेत. पन्नाशीच्या दशकात मुलींना लग्नाच्या जाळ्यांत ओढून फसविणाऱ्या 'माधव काझी'चा खटला, महाराष्ट्रभर गाजला होता. अन् मो. ग. रांगणेकर त्यांच्या बिकट परिस्थितीत असलेल्या 'नाट्यनिकेतन'साठी एका दमदार नाटकाच्या शोधात होते.

अर्थात अत्र्यांनी रांगणेकरांना तत्काळ होकार वा नकारही दिला नाही. 'बघतो' म्हणाले, मात्र 'मराठा'चे उपसंपादक आत्माराम सावंत यांनी त्या खटल्याचे सर्व वृत्तांत 'साहेबां'समोर ठेवले, तेव्हा अत्र्यांना त्यातील नाट्य जाणवलं आणि अडीच-तीन महिन्यांत नाटक लिहून झालं.

नाटकाचा पहिला प्रयोग ८ ऑक्टोबर ६२ला दिल्लीच्या 'आयफेक्स' थिएटरमध्ये जाहीर झाला होता. मुख्य नाटक कोर्टात घडत असलं, तरी या नाटकातील 'फ्लॅश-बॅक' तंत्रासाठी एका स्टेजचे दोन भाग करून अर्धगोलाकार पडद्यांचा उपयोग करायचं ठरलं होतं. प्रभाकर पणशीकर 'नाट्यनिकेतन'चे व्यवस्थापक होते. त्यांनी 'लखोबा'च्या भूमिकेसाठी आत्माराम भेंडे, दामू केंकरे, राजा गोसावी, रमेश देव अशी नावं सुचवली, पण रांगणेकरांनी ती भूमिका अनपेक्षितपणे, एरवी छोट्या भूमिका करणाऱ्या पणशीकरांनाच देऊ केली. त्यांचं नांव ऐकल्यावर अत्रे बिथरलेच.




**निमित्त**

तरीही पणशीकरांनाच भूमिका देताना रांगणेकर त्यांना म्हणाले, 'पणशीकर, एका नटाला एका नाटकात पाच वेगवेगळ्या भूमिका साकारायला लावणारं हे जगातलं पहिलं नाटक असावं. मन लावून भूमिका करा, ही भूमिका तुम्हाला कुठल्या कुठे घेऊन जाईल!' या नाटकातला नायक - खरंतर खलनायक - 'लखोबा' हा लखोबा लोखंडे, दिवाकर दातार, दाजीशास्त्री, कॅप्टन अशोक परांजपे, राधेश्याम महाराज अशा पाच भूमिकांत नऊ वेळा कपडे अन् रंगभूषा बदलतो.

पहिल्या प्रयोगाचा पहिला अंक झाल्यावर अत्रे स्टेजमागे आले अन् पणशीकरांना म्हणाले, 'छान झाला पहिला अंक!' पणशीकरांना तेवढं पुरेसं होतं. पुढे या 'कोर्टरूम' ड्रामाच्या देण्याघेण्यावरून ४६ प्रयोगानंतर अत्रे-रांगणेकर यांच्यात 'कोर्टबाजी' झाली. शेवटी कोर्टाने तडजोड करून अजून १५० म्हणजे एकूण १९६ प्रयोगानंतर, १९६४ अखेरीस नाटकाचे हक्क अत्र्यांना मिळतील हे पाहिलं. जानेवारी १९६५ला नाटकाचे हक्क मिळाल्यावर नाटकांतील 'लखोबाची' प्रमुख भूमिका करणारे प्रभाकर पणशीकर अत्र्यांना येऊन मिळाले.

अत्रे थिएटर्सच्या 'तो मी नव्हेच'चा पहिला प्रयोग २६ जानेवारी ६५ला कोल्हापुरातच करायचा होता. अजून दोनेक महिने हातात होते. तरी रंगमंच तयार होऊन तांत्रिक सफाई व्हावी म्हणून पहिला प्रयोग ७ फेब्रुवारीला ६५ला ठरला. फिरत्या रंगमंचाची ही किमया मुंबईत भल्याभल्यांना जमली नाही, ती कोल्हापूरच्या म्हादबा मिस्त्रींच्या 'विश्वास इंजिनियरिंग वर्क्स'ने केली. म्हणून अत्र्यांनी या सर्वार्थानं 'फिरत्या' रंगमंचाचं नामकरण केलं 'विश्वास रंगमंच'! या कामाचा 'विश्वास इंजिनियरिंग वर्क्स'ने एक पैसाही घेतला नव्हता. त्यांनी तो रंगमंच भेट म्हणून दिला होता!

७ फेब्रुवारी १९६५ रोजी कोल्हापूरच्या राजाराम पटांगणावरील रंगमंचावर 'तो मी नव्हेच'चा 'फिरत्या रंगमंचावरील' प्रथम प्रयोग व्यवस्थित पार पडला! आधी रंगमंचाची तालीमसुद्धा न झाल्यामुळे दृश्यबदल होताना केलेल्या अंधारात उषा सराफ या अभिनेत्रीला रीव्हॉल्विंग स्थिर होण्यापूर्वीच खाली उतरल्याने छोटा अपघात झाला, पण एरवी रंगमंच छान फिरला, कुठे आवाज नाही, खटखट नाही. पंचवीस हजार प्रेक्षकांनी 'फिरता रंगमंच' पाहताना आश्चर्यचकित होऊन टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला! अन् नाटक नव्यानं धूमधडाक्यात सुरू झालं.

**-प्रभाकर बोकील (साभार : फेसबुक)**

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : मोकाट गुरे रस्त्यावर आल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होणे ही बाब शहराजवळील गावच्या रस्त्यांवर आता नित्याचीच झाली आहे.**

## आरोग्य प्रहर

# चेहऱ्यासाठी वापरले जाणाऱ्या 'फेस रोलर'चे फायदे

चेहऱ्याची त्वचा तरूण आणि चमकदार दिसण्यासाठी अनेक प्रकारचे उपाय केले जातात. यामध्ये काही घरगुती तर काही केमिकल्सने युक्त असलेल्या स्किनकेअर प्रॉडक्ट्सचा वापर केला जातो. मात्र, ज्यांची त्वचा संवेदनशील आहे, अशा लोकांना त्वचेची खास काळजी घेणे हे फार महत्वाचे आहे.



मात्र, आता त्वचेची काळजी घेण्यासाठी तुम्ही फेस रोलरचा वापर करू शकता. फेस रोलरचा वापर केल्याने तुमची त्वचा दीर्घकाळ तरूण राहू शकते. आजकाल फेस रोलरचा वापर महिलांकडून मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

या फेस रोलरचा वापर केल्याने त्वचेतील रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते आणि त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. आज आपण त्वचेसाठी लाभदायी असणारा फेस रोलर काय आहे? आणि याचे फायदे कोणते आहेत? ते जाणून घेणार आहोत.

**फेस रोलर म्हणजे काय?**

फेस रोलर हे एक प्रकारचे ब्युटी प्रॉडक्ट आहे. ज्याचा वापर तुम्ही त्वचा आणि मान यांचा मसाज करण्यासाठी करू शकता. फेस रोलरचा वापर केल्याने त्वचेतील रक्तप्रवाह सुरळीत होण्यास मदत होते. मुरूम आणि चेहऱ्यावरील सुरकुत्यांची समस्या दूर करण्यास यामुळे फायदा होतो. तुमची त्वचा कोणत्याही प्रकारची असो तुम्ही बिनधास्तपणे फेस रोलरचा वापर करू शकता.

**फेस रोलरचे फायदे खालीलप्रमाणे**

चेहऱ्यावर फेस रोलरचा वापर केल्याने त्वचेला नैसर्गिक चमक मिळण्यास मदत होते. शिवाय, फेस रोलरमुळे त्वचेतील रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते, ज्यामुळे त्वचेवर ग्लो येतो आणि त्वचा निरोगी बनते.

फेस रोलरचा नियमितपणे चेहऱ्यावर वापर करण्यापूर्वी तुम्ही कोणत्याही प्रकारचे मात्र, तुमच्या त्वचेला सूट होणारे फेस सीरम, किंवा फेशिअल ऑईल लावा. त्यानंतर, फेस रोलरने चेहऱ्याचा मसाज करा. फेस सीरम किंवा फेशिअल ऑईलमुळे चेहऱ्यावरील समस्या दूर होण्यास मदत होते. यासोबतच चेहऱ्यावरील सुरकुत्यांपासून सुटका होते.

जर तुमची त्वचा पफी असेल किंवा चेहऱ्यावर सूज असेल तर फेस रोलरचा जरूर वापर करा. फेस रोलरचा वापर केल्याने चेहऱ्यावरील पफीनेस आणि चेहऱ्यावरील सूज कमी होण्यास मदत होऊ शकते. त्वचेवर फेस रोलरने मसाज केल्याने तुमचा मूड चांगल्या प्रकारे सुधारतो.

फेस रोलरचा नियमितपणे वापर केल्यास सैल त्वचेची समस्या दूर होते आणि तुमची त्वचा टाईट होण्यास मदत होते.

# सरकारचे काम लोकांपर्यंत पोहचवा

## भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा यांचे आवाहन

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. सुधागड तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिकापर्यंत केंद्र व राज्य सरकारने केलेली कामे पोहचवण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. त्यानुसार सुधागड तालुका गाव चलो अभियान राबविण्यात येणार असून बुथ कार्यकर्त्यांचे बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा यांनी दिली.

सुधागडमध्ये या अभियानाबाबत माहिती देऊन बुथ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. देशात सेवा, सुशासन आणि गरीबांचे कल्याण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने राबवलेल्या योजना, त्या योजनांचा प्रत्यक्षात जनतेला झालेला लाभ नागरिकांपर्यंत धुमधडाक्यात पोहचवण्याचे आवाहन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने २०१४ ते २०२४ या दहा वर्षांच्या काळात देशाच्या सर्वच क्षेत्रात प्रचंड गतीने विकास केला आहे. गरीब कल्याण, महिला सशक्तीकरण,



देशांतर्गत व बाह्यसुरक्षा अशा अनेक क्षेत्रात मोदी सरकारने मोठी कामगिरी करून आंतरराष्ट्रीय पातळीवरही देशाचे नाव उंचावले आहे. त्याचप्रमाणे देशातील भाजपशासित राज्यांनीही आपापल्या राज्यात मोठा विकास केला आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जात असताना केंद्र व राज्य सरकारांची हीच विकासाची गाथा तळागाळापर्यंत सांगण्यासाठी भाजप सज्ज झाली आहे. त्यातून लोकसभा निवडणुकीत जनतेचा विश्वास जिंकण्याचा भाजपचा मानस आहे. त्यासाठी भाजपने ग्रामीण भागात गाव चलो अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ४ ते ११ फेब्रुवारी या काळात हे अभियान राबविण्यात येत आहे. दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस गिता पारलेचा व सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'गाव चलो' अभियान राबविण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# कर्जत पंचायत समितीला ओडीएफ प्लसचा दर्जा

## सर्व ग्रामपंचायती हागणदारीमुक्त

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती या स्वच्छ भारत मिशनमधील ओडीएफ दर्जा मिळविण्याचा मान मिळविणाऱ्या ग्रामपंचायती ठरल्या आहेत. हागणदारीमुक्त दर्जा सर्व ग्रामपंचायतींनी मिळविल्याने कर्जत पंचायत समिती ओडीएफ प्लस नामावलीमध्ये पोहचली. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



हागणदारीमुक्त तालुका बनण्यासाठी ओडीएफ प्लससाठी उद्यमन, उत्कृष्ठ दर्जा मिळविणाऱ्या ग्रामपंचायतींचे गुणांकन लक्षात घेवून जिल्ह्यात कर्जत पंचायत समितीने जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी कर्जत तालुका ओडीएफ प्लसचे प्रमाणपत्र स्विकारले. कर्जत पंचायत समिती आणि सर्व ग्रामपंचायत यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हा सन्मान झाला असल्याचे साबळे यांनी जाहीरपणे सांगितले.

# विज्ञान प्रदर्शनात माणगाववाडी आश्रमशाळा प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात कर्जत तालुक्यातील माणगाववाडी आदिवासी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिकृती आदिवासी विभागातील माध्यमिक आणि प्राथमिक गटात रायगड जिल्ह्यातून प्रथम आल्या आहेत. या प्रतिकृतीची निवड कोकण विभागीय विज्ञान प्रदर्शनासाठी झाली आहे.

या विद्यार्थ्यांचे प्रकल्प नेरळ येथे झालेल्या तालुका प्रदर्शनात प्रथम क्रमांकावर राहिले होते. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांची निवड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी झाली होती. पनवेल येथे झालेल्या जिल्हा विज्ञान प्रदर्शनात आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी



मांडलेल्या प्रतिकृतींना माध्यमिक आणि प्राथमिक गटात प्रथम क्रमांक मिळाले आहेत. प्राथमिक गटात स्वप्नील सुरेश या विद्यार्थ्याने शिक्षक सचिन वाशीकर यांचे मार्गदर्शन घेऊन शेतकऱ्यांचे कष्ट कमी व्हावेत यासाठी मांडलेली शेती सुलभ यंत्र ही प्रतिकृती आदिवासी गटात जिल्ह्यात प्रथम क्रमांकाची ठरली आहे.

माध्यमिक गटात केतन जयराम दरवडा याने संदीप भोसले यांचे मार्गदर्शन घेऊन हवेचे शुद्धीकरण ही प्रतिकृती मांडली होती. प्रदूषित हवा पाण्यातून जाऊ देणे आणि त्यातून हवेतील जड धुलिकण, सल्फरडाय ऑक्साईड आणि किटकनाशके पाण्यात मिसळतात. त्यासाठी कोळसा आणि चारकोल यांचे कार्य होऊन मिथेन, कार्बन-मोनॉक्साईड, अतिरिक्त वाफ -दुमटपणा शोषला जातो आणि जंतुनाशक प्रक्रिया होऊन दोन्ही टप्प्यात शुद्ध झालेली हवा कापूरावरून जाऊ दिली असता त्याचा अंश हवेत मिसळतो. यामुळे हवेतील रोगकारक सूक्ष्मजीव नष्ट होतात. असा हवा शुद्धीकरण यंत्र प्रकल्प जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळवून कोकण विभागीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

माणगाववाडी आश्रमशाळेचे कार्यवाह माधव गायकवाड, मुख्याध्यापक नंदकुमार इकारे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यपक आणि शिक्षक वर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# जामरूंगमध्ये बिबट्याचा वासरावर हल्ला

**रायगड** : कर्जत तालुक्यातील जामरुंगजवळ बिबट्याने वासराला ठार मारले आहे. सोमवारी रात्री २.३० वा.च्या सुमारास हिऱ्यांचीवाडी येथे बिबट्याने वासराला लक्ष्य केले. या घटनेमुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. बाळू ठोंबरे यांच्या गायीचे वासरू हिऱ्याचीवाडी भागात चरत असताना पाठीमागून बिबट्याने झडप घालून त्याच्यावर हल्ला केला. या घटनेची माहिती बाळू ठोंबरे यांनी वनविभागाचे अधिकारी विठ्ठल खांदेश्वर यांना कळवली आहे.


## शुद्धीपत्रक

दिनांक ०६/०२/२०२४ रोजी पान नं. ५ वर प्रसिध्द झालेल्या ग्रुप ग्रामपंचायत लोधिवलीच्या जाहिरातीमध्ये ६ नंबरच्या रकान्यामधील रकमेत नजरचुकीने १९००० हजार असे छापले गेले आहे ते ९९००० हजार असे वाचावे.

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**
**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**
वांद्रे रेक्लमेशन डेपोसमोर, लीलावती हॉस्पिटल जवळ, के.सी.मार्ग. वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०. **Tel. No.:** 022-26517938 **Website:** www.msrdc.in
**म.रा.र.वि.म.** **E-Tender Portal:** http://mahatenders.gov.in **email:** coastalroad.msrdc@gmail.com

**शुद्धीपत्रक**

**कोकण आपत्ती सौम्यीकरणातर्गंत रायगड, रत्नागिरी, पालघर, ठाणे व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध ठिकाणी बहुउद्देशिय चक्रीवादळ निवारा केंद्रांचे बांधकाम करणे व पालघर जिल्ह्यामध्ये धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांचे बांधकाम करणे.**

उपरोक्त कामांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. मार्फत पात्र निविदाकारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांचे सुधारित वेळापत्रक महामंडळाच्या संकेतस्थळावर तसेच **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर **दि. ०६.०२.२०२४** पासून पाहण्यासाठी / डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहील.

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म. मुंबई**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मुमुर्शी, ता. महाड, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती या आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा-वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

**मिळकतींने वर्णन**

| सर्वे/ भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ९४५ | ४-२६-०० पैकी क्षेत्र २-४०-०० | २.११ | श्री. अशोक शांताराम ढवळे<br>श्री. दिलीप शांताराम ढवळे |

महाड
ता. ०७/०२/२०२४

**सही/-**
**ॲड. कुणाल चंदनशिवे**
महाड-रायगड
मो.नं. ९६६५६८५५४४


# रायगडच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या हाती लॅपटॉप

**अलिबाग : प्रतिनिधी**

दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात असणाऱ्या शाळांमध्ये लॅपटॉप वितरीत करून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला आहे. आतापर्यंत ३१ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना लॅपटॉप वितरित केले असून राज्यभर हे अभियान राबविण्यात येत आहे.

लॅपटॉपच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेता यावे, त्यांना संगणक चालविण्याचे शिक्षण मिळावे व गडाच्या राखणदारांच्या आधुनिक शिक्षणाचा मार्ग मोकळा व्हवा, यासाठी हे अभियान राबविले जात



आहे. माणगाव, रोहा व पाली विभागातील अवचितगड, मानगड व मृगगडच्या घेऱ्यामधील जवळपास ३१ शाळांमध्ये लॅपटॉप वितरणाचे काम पूर्ण झाले आहे. टप्याटप्प्याने ही मोहीम राज्यभर राबविली जात आहे. आतापर्यंत माणगाव विभागात १४, रोहा विभागात १३ व पाली विभागात चार शाळांना लॅपटॉपचे वितरण केले आहे. राज्यातील सर्व गडघेऱ्यांच्या परिसरात हे अभियान राबविले जाणार असल्याचे दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हासूरकर यांनी सांगितले.

# कोळी बांधवांना मारहाण केलेल्यांवर गुन्हा दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

एकदरा येथील ध्रुव लोदी यांच्या मालकीची कस्तुरी बोटीतील नाखवा व खलाशांना एलईडी मासेमारी करणाऱ्या परप्रांतीयांकडून मारहाण करण्यात आली होती. ध्रुव लोदी यांच्या तक्रारीनुसार अलिबाग तालुक्यातील आक्षीसाखर येथील मनोज हरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे कोळी बांधवांनी एकत्र येत मुजोरी करणाऱ्या एलईडी मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. ध्रुव लोदी यांनी सांगितले की, मत्स्य विभागाने एलइडीद्वारे मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करावी.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १३६/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील पनवेल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लि.च्या पायाभूत सुविधांचे अपग्रेडेशन करणे. | ₹१५,५९,०१,५६०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०८/०२/२०२४ ते दिनांक २२/०२/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक १२/०२/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०२/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.


# राजपुरी येथे घुबडाला जीवदान



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील जेट्टीच्या ऑफिसमध्ये आलेल्या जखमी घुबडाला प्राणीमित्र संदिप घरत यांनी जीवदान दिले.

राजपुरी जेट्टीच्या ऑफिसमध्ये कर्मचाऱ्यांना जखमी घुबड दिसल्याने त्यांनी त्वरीत याबाबत वनविभागाला कळविले. वनपाल संतोष रेवणे, किरण गायकर व दिनेश रोटकर यांनी प्राणीमित्र संदिप घरत यांच्यासह घटनास्थळी पोहचून जखमी घुबडाला पशुवैद्यकीय दवाखान्यात आणले. डॉ.विनायक पवार यांनी घुबडावर उपचार केले, परंतु पंखांना जखम असल्याने त्याला पिंजऱ्यात ठेवण्यात आले आहे.


## पनवेल महानगरपालिका
## शहर अभियंता विभाग
## ई-निविदा सूचना

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/२०२४/प्र.क्र.०१/४०९/२०२४ — दिनांक : ६/०२/२०२४

**आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय** (Central Government / State Government / Government under taking) **विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/281/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ब, कळंबोली नोड मधील IDBI बँक, सेक्टर- ८ ते सन शाईन सोसायटी पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ९,००,३१,६३९/- |
| २ | PMC/CE/282/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब, कळंबोली नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण करणे. | १६,५२,१०,२०८/- |
| ३ | PMC/CE/283/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क मधील कामोठे नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | २२,६४,७०,३६०/- |
| ४ | PMC/CE/284/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ मधील खारघर नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण करणे. | ३२,९४,०५,४१९/- |
| ५ | PMC/CE/285/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र. २ मधील तोंडरे गाव येथे पाण्याच्या टाकी पासून ते हनुमान मंदिरपर्यंत पावसाळी गटार व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५,१४,७९,९५४/- |
| ६ | PMC/CE/286/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब व ड येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे. | २५,१७,३८,०४१/- |
| ७ | PMC/CE/295/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड मधील पनवेल शहरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे इतर अनुषंगिक कामे करणे. | २५,००,२६,६३३/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ७/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
अतिरिक्त आयुक्त-।
पनवेल महानगरपालिका



**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/म.प्र. १, दि. १८/१०/२०२३ परिशिष्ट-३**
**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,** रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड

ई-मेल :- eerid२४@gmail.com — दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७

## निविदा सूचना क्र.१३ सन २०२३-२४

**महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. (GST वगळून) | इसारा रक्कम रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुंडलिका नदीमध्ये साजे ते कामथ या भागामध्ये चालणाऱ्या राफ्टींगसाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी सोई सुविधा पुरविणे. ता. माणगाव, जि. रायगड | ६५,५२,०५६/- | ६५,६००/- | १२ महिने | रु.२०००/- +रु.३६०/- २३६०/- (ना परतावा) | वर्ग ४-अ व त्यावरील |

निविदा उपलब्ध कालावधी — दि. ०७/०२/२०२४ ते दि. २७/०२/२०२४
Geo-tagging कालावधी — दि.१२/०२/२०२४ ते दि.१६/०२/२०२४

**ई-निविदा उघडण्याचा दि. २३/०२/२०२४**

खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in

१. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
२. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
३. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता :- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं. ४०२३०४. ई-मेल eerid२४@gmail.com
४. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
५. Geo-Tagging ची प्रक्रिया सुरळीत पार पाडणेकरीता निविदा संचामध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यक्षेत्रावरील अक्षांव व रेखांश स्थळी कंत्राटदाराने स्वतः किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधी यांनी कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष भेट देणे आवश्यक आहे. (निविदा संचामध्ये Geo-Tagging प्रमाणपत्राचा नमूद देण्यात आलेला असून, सदरचे प्रमाणपत्र हे कंत्राटदाराने निविदेचा लिफाफा क्र. १ मधून सादर करणे अनिवार्य आहे अन्यथा कंत्राटदाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही व सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

**टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

**सही/-**
**(इंजि. मिलींद पवार)**
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग. कोलाड.

# मालमत्ता कर थकबाकीदारांवर होणार कारवाई

## पनवेल महापालिका ॲक्शन मोडमध्ये ; २४८ कोटींची वसुली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांच्या विरोधात महापालिका कारवाईचे मोठे पाऊल उचलणार आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार महापालिका थकबाकीदारांच्या स्थावर अथवा जंगम मालमत्ता अटकावणी करून त्याची जाहीर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणार आहे.

पनवेल महापालिकेची स्थापना १ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली असून, या दिनांकापासून महापालिका क्षेत्रातील सुमारे तीन लाख ५० हजार मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आली आहे. मंगळवार ६ फेब्रुवारीअखेर २४८ कोटीची वसुली केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकी पोटी जंगम स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करुन जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणेची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस आहे.

मालमत्ता धारकांनी महापालिकेचा मालमत्ता कर भरावा यासाठी महापालिकेने सातत्याने विविध उपाय योजना आमलात आणल्या आहेत. सुरूवातीस एकरकमी मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी शास्तीमध्ये १०० टक्क्यांपासून ते २५ टक्क्यांपर्यंतची टप्प्यातटप्पू ने शास्तीमध्ये सवलत देऊ केली होती.

दिलेल्या मुदतीत हरकत न घेतलेल्या मालमत्ता धारकांना नैसर्गिक न्याय मिळावा या तत्वाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कराधान नियमानुसार कर आकारणीत दुरुस्ती, फेरफार करणेची तरतुद असल्याने मालमत्ता धारकांना हरकत अर्ज करण्यासाठीची एक संधी महापालिकेच्या वतीने देण्यात आली होती.

मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये सूचना दिल्या जात आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www. panvelmc. org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे.

महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. शेवटी महापालिकेने मालमत्ताधारकांना वसुलीच्या नोटीस देण्यास पालिकेने सुरूवात केली व महापालिकेच्या चारही प्रभागामधील, सिडको नोडमध्ये विविध टिमच्या माध्यमातून वसुली करण्यात येत आहे.

आता महापालिका थकबाकीदारांच्या स्थावर अथवा जंगम मालमत्ता अटकावणी करुन त्याची जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणार आहे. यामध्ये औद्योगिक, निवासी, अनिवासी यांचा समावेश असणार आहे.

# शिरवणेत इमारतीला लागलेली आग दुसऱ्या दिवशी विझली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे एमआयडीसीमधील मे. माल रिअल इस्टेट इमारतीच्या २८व्या मजल्यावर सोमवारी सायंकाळी अचानक आग लागली. या आगीचे निखारे बाजूला असणाऱ्या झोपडपट्टीमधील घरावर पडून मोठी जिवितहानी होण्याचा धोका लक्षात घेऊन डी ब्लॉक अग्नीशमन विभागाच्या नियंत्रणाखाली तब्बल पाच अग्नीशमन दलाच्या गाड्या रात्रभर स्टँड बाय होत्या. सोमवारी लागलेली आग अखेर मंगळवार सकाळी ९ वाजता विझली. या आगीत सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही.

ठाणे बेलापूर इंडस्ट्रीमधील शिरवणे एमआयडीसी हद्दीत असणाऱ्या डी २२३ भूखंडावर मे. माल रिअल इस्टेट इमारतीच्या २८व्या मजल्यावर सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजता अचानक आग लागली. या मजल्यावर लावण्यात आलेल्या लाकडी स्लॅबने अचानक पेट घेतल्याने आगीचे निखारे इमारतीच्या जवळील झोपडपट्टीमध्ये वेगाने येत होते.



आगीचे रौद्ररूप लक्षात येताच डी ब्लॉक अग्नीशमन विभागाने तब्बल ५ गाड्या पाचारण केल्या. अग्नीशमन अधिकारी संतोष पाटील आणि प्रमोद माळी यांच्या मार्गदर्शनाखाली २८व्या मजल्यावर जाऊन या आगीत पेट घेणाऱ्या वस्तू आणि साहित्य सुरक्षित केल्याने आगीने रौद्र रूप धारण केले नाही. ही आग आटोक्यात येण्यास सकाळी नऊ वाजेपर्यंत प्रतीक्षा करावी लागली. या आगीतून येणारे निखारे यामुळे धोका निर्माण होऊ नये म्हणुन पाच अग्नीशमन गाड्या रात्रभर स्टँड बाय होत्या. या आगीत कोणतीही जिवितहानी झाली नसल्याचे अग्नीशमन विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

# १७ व १८ फेब्रुवारीला महारोजगार मेळावा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता आयुक्तालय यांच्या वतीने १७ आणि १८ फेब्रुवारी २०२४ रोजी ठाणे येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.




या बैठकीस कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी रायगड डॉ. योगेश म्हसे, कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त श्री.दि.दे.पवार तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे येथे होणाऱ्या महारोजगार मेळाव्यासाठी मोठया प्रमाणात रोजगारांची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उद्योजक संस्था, संघटना, औद्योगिक कंपन्या, रोजगार देणाऱ्या संस्था, यांच्याशी समन्वय साधून मोठया प्रमाणावर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्योजक नोंदणी आणि रिक्त पदे अधिसूचित करणे यासोबतच विविध उद्योजक संघटनांना यामध्ये सामावून घेतले जाणार आहे. मेळाव्यात येणाऱ्या संस्था आणि बेरोजगार तरुणांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप आणि अन्य व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. महारोजगार मेळाव्याच्या पूर्व व नंतरच्या प्रसिध्दीसाठी विशेष नियोजन केले जात आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता अकाउंट व फायनान्स विभाग व सत्यम इन्स्टिट्यूट ऑफ टॅक्स अँड अकाउंटंट खारघर या दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या सामाजिक करारासाठी सत्यम इन्स्टिटच्यूट ऑफ टॅक्स अँड अकाउंटंटचे संदीप मालुसरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमधे ज्ञान-संसाधनाची देवाण-घेवाण होईल अशी हमी देण्यात आली. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील अकाउंट फायनान्स विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच व प्रशिक्षण देण्यात येईल.

या सामंजस्य करारासाठी प्रा. महेश्वरी झिरपे, समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, अकाउंट व फायनान्स विभागाचे प्रमुख प्रा. प्रवर शर्मा, प्रा. करिष्मा कडव, प्रा. तनुजा सुमन, प्रा. योगिता पाटील हे उपस्थित होते.

# श्री महागणपतीच्या माघी उत्सवासाठी चिरनेर देवस्थानासह ग्रामस्थ सज्ज

**उरण : रामप्रहर वृत्त**

माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने (मंगळवार १३ फेब्रुवारी) उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील अत्यंत प्राचीन अशा श्री महागणपती मंदिरात येणाऱ्या लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनासह चिरनेर ग्रामस्थांनी भक्तांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर येथे अष्टविनायका सारखे श्री महागणपती हे प्रख्यात देवस्थान आणि धार्मिक स्थळ असल्याने येथील जागृत महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर राज्याच्या विविध प्रांतांच्या कानाकोपऱ्यातून भाविक गणेश भक्तगण दर्शनासाठी चिरनेर या धार्मिक स्थळी येत असतात. या उत्सवाला परिसरात यात्रेचे स्वरूप येते. वर्षातील माघी गणेशोत्सव हा प्रचंड मोठा उत्सव होत असून, संपूर्ण चिरनेर गाव भाविक भक्तगणांनी फुलून निघते. विविध धार्मिक कार्यक्रम १० ते १४ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहेत, अशी माहिती मंदिर प्रशासनाकडून देण्यात आली.

# उरणमध्ये एचआयव्ही एड्स, टीबी, एसटीआय एचबीएसएजी जागृती शिबिर



**उरण : वार्ताहर**

इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रूग्णालय उरण व वीर वाजेकर कॉलेज फुंडे यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही एड्स, टीबी, एसटीआय एचबीएसएजी अवेअरनेस कॅम्प घेण्यात आला.

या कॅम्पमध्ये डॉ. बाबासो कालेल वैद्यकिय अधिक्षक, प्राचार्य प्रल्हाद पवार, प्रॉ. चिंतामण धिंधले, महादेव पवार समुपदेशक व तृप्ती परजने प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपस्थित होते. या कॅम्पमध्ये डॉ. बाबासाहेब कालेल वैद्यकिय अधिक्षक यांनी उपस्थित सर्व विद्यार्थांना एच आय व्हीं म्हणजे काय, एड्स म्हणजे काय, ए आय व्ही होन्याची कारणे, इतिहास,निदान, गैरसमज, उपचार, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानतंर महादेव पवार समुपदेशक यांनी एचआयव्ही एड्स अॅक्ट २०१७ कायदा, गुप्तरोग, टिबी, आरोग्य याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. आणि शेवटी विद्यार्थी सोबत संवाद साधला त्यांचे प्रश्नांचे उत्तर देऊन त्याचे निरसन केले.

या कॅम्पमध्ये एकूण ८५ विद्यार्थी उपस्थित होते आणि त्यापैकी ३५ जणांची एचआयव्ही तपासणी करण्यात आली.



# पटवर्धन रुग्णालयातर्फे शुक्रवारी व्याख्यान

**पनवेल : वार्ताहर**

रा.स्व. संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाच्या वर्धापन दिनानिमित्त जेष्ठ राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर यांचे बदलता भारत विषयावर व्यखयानाचे आयोजन करण्यात आले आहे.

रुग्णालयाचा २६वा वर्धापन दिन व डॉ. प्रभाकर पटवर्धन यांच्या २७व्या स्मृती दिनानिमित्त आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि. ९) सायंकाळी ६.३० वा. आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन अध्यक्ष डॉ. किर्ती समुद्र, उपाध्यक्ष डॉ. ययाती गांधी, कार्यवाह राजीव समेळ यांनी केले आहे.

# नवी मुंबईकर अभियान अंतर्गत नागरिकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शिक्षक पालक यांच्यासह समाजातील सर्व घटकांनी जागरूक राहण्याची गरज असल्याचे ओळखून वाशी येथील नवी मुंबई महापालिका शाळा क्र.२८ मध्ये जागरूक नवी मुंबईकर अभियान अंतर्गत नागरिकांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई पोलिसांच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या जागरूक नवी मुंबईकर अंतर्गत सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.विशाल माने प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. ऑनलाईन बँकिंग फसवणूक करणाऱ्या गुन्हेगार टोळ्या मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाल्या आहेत. त्यामुळे स्मार्ट तंत्रज्ञान युगात नागरिकांना स्मार्ट तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. अन्यथा आपली फसवणूक होऊ शकते असे सांगत अनेक उदाहरणे देत डॉ. विशाल माने यांनी सदर कार्यशाळेत मार्गदर्शन केले. नवी मुंबई महापालिका शाळा क्र.२८ येथे नागरिकांसाठी कार्यशाळा आणि संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी जागरूक नवी मुंबईकर अभियान मध्ये सहभाग घेतल्याबद्दल नवी मुंबई पोलिसांकडून कृपासिंधू प्रतिष्ठान संस्थेला गौरविण्यात आले.

वाशी सेक्टर १४,१५ आणि इतर परिसरातील सुमारे २५० नागरिकांनी या संवाद कार्यशाळेला उपस्थिती दर्शविली.

# पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी स्वीकारला पदभार

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ २च्या पोलीस उपायुक्तपदाचा विवेक पानसरे यांनी मंगळवारी (दि. ६) पदभार स्वीकारला.

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या गेल्या काही दिवसांमध्ये करण्यात आल्या. त्यामध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १मध्ये कार्यरत असणारे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांची बदली नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ २ येथे करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी पदाचा पदभार पनवेल येथे येऊन स्वीकारला आहे तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांची बदली नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ येथे करण्यात आली आहे.

पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्वरित सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची बैठक घेऊन येथील गुन्हेगारी, राजकीय व इतर विषयांतील दाखल होणाऱ्या गुन्ह्यासंदर्भात आढावा घेतला आहे. विवेक पानसरे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ येथे आपल्या कामाचा चांगलाच ठसा उमटवित मोठ मोठ्या गुन्ह्यांची उकल त्यांच्या कार्यकाळात झाली आहे.



# गव्हाण विद्यालयात हळदीकुंकू समारंभ उत्साहात

## शकुंतला रामशेठ ठाकूर यांची अध्यक्षीय उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये मंगळवारी (दि. ६) माता पालक मेळावा अंतर्गत हळदीकुंकू समारंभ उत्साहात झाला.

या दिनाच्या औचित्य साधून दुपारी महिलांचे आरोग्य शिबिरदेखील आयोजित करण्यात आले. शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांच्यासमवेत त्यांच्या स्नुषा अर्चना परेश ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर तसेच विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, महिला मोर्चाच्या अध्यक्षा योगिता भगत आदी उपस्थित होते. त्यावेळी आरोग्य विभागाचे अधिकारी डॉ. शैलेश खंडारे, ऋतुजा गायकवाड, हिरकणी कोळी, मेहेत्रे मॅडम आदी अधिकाऱ्यांनी महिला वर्गाची तपासणी केली.



सार्वजनिक व कौटुंबिक जीवन जगत असताना महिलांचे विशेष अधिकार व हक्क यांची त्यांना जाणीव करून देऊन त्यांचे समाजातले महत्त्व अधोरेखित करणारे कायदे तज्ञ दिपाली बांद्रे यांची अत्यंत सुश्राव्य व्याख्यान या वेळी झाले. या वेळी महिलांना मार्गदर्शन करताना अर्चना परेश ठाकूर यांनी महिलांना कायदेविषयक ज्ञान असणं अत्यंत आवश्यक असून महिलांच्या सक्षमीकरणांमध्ये आजच्या व्याख्यानाचा निश्चित उपयोग होईल अशा भावना व्यक्त केल्या.

माजी पनवेल पंचायत समितीच्या सदस्या रत्नप्रभा घरत यांनी श्री. छत्रपती विद्यालयाच्या जडणघडणीमध्ये आणि एकूणच संस्थेच्या विकासामध्ये लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या विशेष उल्लेखनीय कार्याचा आढावा घेतला आणि महिलांना या समारंभ निमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा शकुंतला रामशेठ ठाकूर या आवर्जून उपस्थित होत्या. त्यांनी सर्व महिलांना हळदी कुंक समारंभानिमित्त शुभेच्छा दिल्या.

त्याचबरोबर त्यांच्या स्नुषा अर्चना परेश ठाकूर, पनवेल पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत तसेच स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन यांच्या सौभाग्यवती शांताताई अरुणशेठ भगत, गव्हाणच्या सरपंच माई भोईर, सदस्य योगिता भगत, सीमा भगत, उषा देशमुख व कामिनी कोळी, सीमा भगत, जयश्री घरत, दया ठाकूर, सुजाता पाटील, सुनीता कांबळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राधाताई ठाकूर, मनीषा ठाकूर यांनी आपली उपस्थिती दाखवली.

या वेळी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रमुख वक्त्या लाभलेल्या कायदेतज्ञ दिपाली बांद्रे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी महिला जागृती अंतर्गत महिला हक्काचे कायदे विषयक माहिती महिलांना दिली. सर्व महिला त्यांच्या वक्तव्याने मंत्रमुग्ध झाल्या होत्या. या कार्यक्रमाच्या आयोजक आणि माता पालक मेळाव्याच्या प्रमुख एस एस ठाकूर यांनी वरील सर्व नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी आर वर्तक यांनी केले. या वेळी कार्यक्रमासाठी सी.एम. पाटील, वाय.एस.पाटील, सी एन ठाकूर त्याचप्रमाणे संपूर्ण शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे आणि उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले यांनी सर्व सेवकांना विशेष असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार संस्कृतिक विभाग प्रमुख एच आर पाटील यांनी केले.

# नमो कुस्ती महाकुंभाची जय्यत तयारी

## भारतातील दिग्गज पैलवानांमध्ये होणार घमासान

**जामनेर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध भारत केसरी बिनिया मिन, ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी विरुद्ध जम्मू केसरी मुस्तफा खान अशा एकापेक्षा एक अशा १३ कुस्ती दंगली आणि त्याचबरोबर खानदेश आणि परिसरातील १००पेक्षा अधिक पैलवानांचे द्वंद्व पाहण्याचे भाग्य येत्या ११ फेब्रुवारीला जामनेरमध्ये मिळणार आहे. निमित्त आहे नाद कुस्तीचा, प्रण व्यसनमुक्तीचा हा मंत्र भारतातील तरुण पिढीपर्यंत पोहचविण्याचे.

सध्या युवापिढीमध्ये वाढत चाललेल्या उत्तेजक द्रव्य सेवनाचा फॅड रोखण्यासाठी आणि तरुणांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे ध्येय समोर ठेवत ग्रामविकास, पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकाराने जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे नमो कुस्ती महाकुंभ या



पै. बनिया मीन, शान ए हिंद, भारत केसरी (जम्मू काश्मीर) वि. पै. सिकंदर शेख, महाराष्ट्र केसरी, महान भारत केसरी (महाराष्ट्र)

पै. विजय चौधरी, विश्व विजेता, ट्रिपल महाराष्ट्र कसरी (महाराष्ट्र) वि. पै. मुस्तफा खान, शेर ए जम्मू केसरी (जम्मू काश्मीर)

भारतातील सर्वांत मोठ्या कुस्ती दंगलचे आयोजन केले आहे. ही कुस्ती दंगल जामनेरच्या गोविंद महाराज क्रीडांगणावर खेळवली जाणार आहे.

या दंगलीत महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख हा भारत केसरी बिनिया मिनला आव्हान देणार आहे. त्याचबरोबर महेंद्र गायकवाड (उप महाराष्ट्र केसरी) वि. मनजीत खत्री (भारत केसरी), विजय चौधरी (ट्रिपल महाराष्ट्र केसरी) वि. मुस्तफा खान (शेर-ए-हिंद), प्रकाश बनकर (उप महाराष्ट्र केसरी) वि. भूपिंदर सिंह (भारत केसरी), किरण भगत (उप महाराष्ट्र केसरी) वि. गुरुजनट सिंह (पंजाब केसरी), बालारफिक केसरी (महाराष्ट्र केसरी) वि. मनप्रीत सिंग (पंजाब केसरी), अजय गुज्रर (भारत केसरी) वि. माउली कोकाटे (उप महाराषट्र केसरी), सुमित मलिक (अर्जुन अवॉर्ड, हिंदकेसरी) वि.हॅपी सिंह (पंजाब केसरी), प्रितपाल सिंग वि. शंटी कुमार (दिल्ली केसरी), समीर शेख (महाराष्ट्र चॅम्पियन) वि. कलवा गुज्रर (भारत कुमार), जतींदर सिंह (रुस्तुम-ए पंजाब) वि. सत्येन्द्र मलिक (भारत केसरी), कमलजित (रुस्तुम-ए-हिंद) वि. माउली जमदाडे (भारत केसरी) आणि रेहान खान (मध्य प्रदेश केसरी) वि. कमल कुमार (शेर-ए-पंजाब) या १३ प्रमुख लढती होणार कुस्तीप्रेमींना दिग्गजांच्या कुस्त्या याची देही याची डोळा पाहाता येणार आहेत. दिग्गजांबरोबर खान्देश आणि परिसरातील १०० पैलवानसुद्धा या दंगलमध्ये आपल्या कुस्तीचे डावपेच दाखविणार आहेत.

> **दरवर्षी जामनेरमध्ये आपल्या मातीतील खेळाचे आयोजन करून तरुण पिढीला नाद कुस्तीचा, प्रण व्यसनमुक्तीचा हा संदेश आम्ही देणार आहोत. त्यामुळे जामनेरकरांनी न भुतो न भविष्यति ठरणाऱ्या कुस्तीच्या महाकुंभाचा थरार अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने यावे.**
>
> **-मंत्री गिरीश महाजन, आयोजक**

### विजेत्यांवर लाखोंच्या बक्षिसांचा होणार वर्षाव

११ फेब्रुवारीला जामनेरमध्ये रंगणारी दंगल संस्मरणीय व्हावी म्हणून मंत्री गिरीश महाजन यांनी १३ दंगलीतील विजेत्यांवर लाखो रुपयांच्या बक्षिसांचा वर्षाव करणार असल्याची माहिती दिली. एवढेच नव्हे तर विजेत्या खेळाडूला तीन किलो वजनाची चांदीची गदा आणि नमो कुस्ती महाकुंभ हा मानाचा पट्टाही बहाल केली जाईल. अव्वल दंगलीतील पराभूत खेळाडूलाही रोख पुरस्कार दिले जाणार आहेत.

# राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राजस्थानमधील जयपूर सवाई मानसिंग स्टेडियम येथे इंडिया तायक्कांदो आयोजित राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत रसायनी, रायगड व नवी मुंबईतील खेळाडूंची विविध प्रकारांत निवड करण्यात आली आहे.

श्रवण भोसले, करण खाडे व आयुष कदम यांची सब-ज्युनिअर; तर साईराज पाटील, मुस्तफा शेख, निहाल भोईर व प्रेम पाटणे यांची ज्युनिअर क्युरेगी संघात निवड झाली आहे. यासोबतच पुमसे प्रकारात श्रवण भोसले व स्वराली माटेकर (सब-ज्युनिअर जोडी), आशिष राडिये, चैतन्य नागणे (कॅडेट वैयक्तिक मुले), ओमकार चव्हाण व वियोना थेस्मा (कॅडेट जोडी), राज जाधव, ओमकार चव्हाण व आशिष राडिये (कॅडेट संघ मुले) तसेच (ज्युनिअर वैयक्तिक मुले) महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व करतील. यासोबतच संजय भोईर यांची प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे.

विशेष म्हणजे नाशिक विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या महाराष्ट्र राज्य तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेत रायगड संघाला पुमसे प्रकारात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले होते, तर क्युरेगी (सब-ज्युनिअर) प्रकारातदेखील तृतीय क्रमांक पटकाविला होता. ११ सुवर्ण, नऊ रौप्य व ११ कांस्य अशी एकूण ३१ पदके जिंकून ही कामगिरी साकारली गेली.

सर्व खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक, पंच यांचे अमॅच्युअर तायक्कांदो असोसिएशन ऑफ रायगड अध्यक्ष अ‍ॅड.प्रज्ञा भगत, उपाध्यक्ष संजय भोईर, सचिव सचिन माळी, खजिनदार रोहित सिनलकर व इतर सर्व पदाधिकारी, अकॅडमी, पालकांनी अभिनंदन केले तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# शरीरसौष्ठवपटू निलेश दगडे, पूनम लोकरे ठरले किताब विजेते

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुरुषांमध्ये निलेश दगडे आणि महिलांमध्ये पूनम लोकरे किताब विजेते ठरले.

या स्पर्धेत ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८० किलो आणि खुला असे गट होते. या वेळी खासदार सुनील तटकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली तसेच जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, खासदार श्रीरंग बारणे यांचे पुत्र विश्वनाथ बारणे, अशोक मुंढे, सुदाम मुंढे, तात्या म्हसकर, प्रकाश गायकवाड, कैलास म्हात्रे, रेश्मा कुरूप, वर्षा पाटील, अनिल पिंगळे, गजानन माळी, दत्ता शिंदे, वासांबे ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामसेवक, टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव व सहकारी उपस्थित होते.

बेस्ट पोझर सम्राट ढाले, बेस्ट इम्प्रूमेंट अशितोष शहा, मेन्स फिजिक्स युवराज आणि वूमन्स बॉडी बिल्डिंगमध्ये किमया बेर्डे आदींना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# बेलापूर नमो चषकाचा तुर्भे संघ विजेता

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्रातील नमो चषक २०२४च्या क्रिकेट स्पर्धेचा सांगता समारंभ करावे येथील कै. गणपतशेठ तांडेल मैदान येथे उत्साहात झाला. या स्पर्धेत तुर्भे येथील जय गजानन संघ विजतेपद पटकाविले. आराध्या इलेव्हन शहाबाज संघ उपविजेता ठरला. आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.



या क्रिकेट स्पर्धेत २८ संघ तसेच ४०+च्या आठ संघांनी सहभाग नोंदविला. मुख्य स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज अक्षय कोळी, उत्कृष्ट गोलंदाज अजित चव्हाण, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक राकेश, मालिकावीर म्हणून रवी म्हात्रे यांची निवड करण्यात आली.

४०+ क्रिकेट स्पर्धेत सारसोळे संघ विजेता, दारावे उपविजेता ठरला. उत्कृष्ट फलंदाज जयेश मेहेर, उत्कृष्ट गोलंदाज रवी तांडेल, मालिकावीर म्हणून राजेश भोईर यांची निवड झाली. विजेते संघ व गुणवंत खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.


पारितोषिक वितरण समारंभास माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, सुनील पाटील, निलेश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप पाटील, कुंदन म्हात्रे, विकास सोरटे, पुण्यनाथ तांडेल, जयवंत तांडेल, गुरूनाथ तांडेल, संजय ओबेरॉय, विकास सोरटे, प्रताप भोसकर, सचिन नाईक यांच्यासह खेळाडू व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# माणगाव येथे आमदार चषक कबड्डी स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमधील लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठानतर्फे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विद्युत प्रकाशझोतातील भव्य खुली आमदार चषक २०२४ पुरुष कबड्डी स्पर्धेचे आयोजन १० व ११ फेब्रुवारी रोजी अशोकदादा साबळे विद्यालय येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत तालुक्यातसह जिल्ह्यातील कबड्डी संघांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांकास २१ हजार रुपये, द्वितीय १५ हजार, तृतीय ११ हजार, चतुर्थ क्रमांकास सात हजार रुपये, सर्वोत्कृष्ट खेळाडू तीन हजार, उत्कृष्ट पकडपटू व चढाईपटू यांना प्रत्येकी दोन हजार रुपये आणि सर्व विजेते व चमकदार कामगिरी



करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक चषक देण्यात येणार आहेत.

जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांकास ५१ हजार रुपये, द्वितीय ३१ हजार, तृतीय २१ हजार, चतुर्थ क्रमांक ११ हजार, सर्वोत्कृष्ट खेळाडू पाच हजार, उत्कृष्ट पकडपटू व चढाईपटू यांना प्रत्येकी तीन हजार रुपये आणि सर्व विजेते व चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक चषक देण्यात येणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आस्वाद पाटील, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रमेश मोरे, शिवसेना रोहा तालुकाप्रमुख समीर शेडगे यांच्या हस्ते; तर बक्षीस वितरण आमदार भरत गोगावले, शिवसेना माणगाव तालुकाप्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर यांच्या हस्ते होणार आहे.

स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी समाधान उतेकर (७५५९४९७०९४), राजेंद्र सुर्वे (९३५६३४३३०६), सिद्धेश पिंगळे (९२७२३०५२७७), प्रसाद धारिया (९९२२२१८३२३२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

# रायगडचा पुरुष क्रिकेट संघ जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे खेळविण्यात येणाऱ्या निमंत्रितांच्या पुरुष खुल्या गटाच्या क्रिकेट स्पर्धेसाठी रायगडचा संघ निवडण्यात आला आहे. रायगडच्या कर्णधारपदाची धुरा निकुंज विठलानी याच्याकडे सोपविण्यात आली आहे. एकूण पाच सामन्यांपैकी पहिल्या दोन सामन्यांसाठी रायगडचा संघ बुधवारी (दि. ७) पुणे येथे रवाना होईल.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे पुरुष खुल्या गटाचा संघ निवडण्यासाठी उरण भेंडखळ येथील ठाणकेश्वर मैदानावर दोन दिवसीय निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या चाचणीत जिल्ह्यातील १२० खेळाडू सहभागी झाले होते. यातून खेळाडू निवडून त्यांचे तीन संघ तयार करण्यात आले.

रिलायन्स कंपनीच्या नागोठणे येथील मैदानावर प्रत्येक संघाचे दोन सामने खेळविण्यात आले. त्यातून खेळाडूंची कामगिरी पाहून योगेश पवार, चंद्रकांत चौधरी, अरुण तरे यांच्या निवड समितीने रायगडचा संघ निवडला.

सराव सामन्यांसाठी 'रिलायन्स'चे उदय दिवेकर, विश्वनाथ उतेकर यांचे सहकार्य लाभले. संदीप पाटील यांनी संपूर्ण स्पर्धेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. या वेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, उपाध्यक्ष प्रकाश पावसकर, प्रीतम कय्या, सुहास हिरवे उपस्थित होते.

**असा आहे संघ**

निकुंज विठलानी (कर्णधार), अभिषेक श्रीवास्तव, प्रतिक म्हात्र, देवांश तांडेल, श्रेयश कुमार, मल्हार वंजारी, रितेश तिवारी, विघ्नेश पाटील, रितेश नलावडे, विक्रांत जैन, अभय पाटील, संकेत गोवारी, श्रेयश देशमुख; राखीव: ऋषिकेश जाधव, शिवम आगरवाल, निनाद बोभाटे, प्रतिक घोटसुर्वे, दिपेश नाईक, संतोष गोस्वामी, तेजस मोहिते, राहुल नवखारकर, साहिल देसाई, लौकिक पाटील, संस्कार म्हात्रे, अनिकेत मोहतो.

# दुसऱ्या कसोटीनंतर इंग्लंडचा संघ दुबईत

**दुबई** : भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा कसोटी सामना राजकोटमध्ये १५ फेब्रुवारीपासून खेळवला जाणार आहे. सध्या मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. या मालिकेतील दुसरी कसोटी हरल्यानंतर इंग्लंडचा संघ दुबईत गेला आहे. हा संघ अबुधाबी येथील सराव शिबिरानंतर १२ किंवा १३ फेब्रुवारीला भारतात परतेल. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, खेळाडूंना विश्रांती हवी आहे आणि क्रिकेटपासून दूर वेळ घालवायचा आहे.






# पॉवरलिफ्टर देवदत्त भोईर 'जीवन गौरव'ने सन्मानित



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवाईनगर ठाणे येथे वास्तव्यास असलेले ज्येष्ठ पॉवरलिफ्टिंग खेळाडू देवदत्त मार्तंड भोईर यांना नुकताच तेथील पॉवरलिफ्टिंग संघटनेकडून जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

देवदत्त भोईर यांनी २००७मध्ये आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दोन सुवर्ण दोन रौप्य व एक कांस्यपदक जिंकलेले आहे. नुकतेच वयाच्या ७१ वर्षात पदार्पण केलेले भोईर यांनी कोणत्याही प्रकारचे फूड सप्लीमेंट घेतलेले नाही हे विशेष. राष्ट्रीय पंच स्तर १ म्हणूनही त्यांची ख्याती आहे. ठाणे जिल्हा पॉवरलिफ्टिंग संघटनेत विविध महत्त्वाच्या पदावर काम करून या खेळाची व्याप्ती त्यांनी ग्रामीण भागातसुद्धा वाढविली आहे. या कार्याची दखल घेत त्यांना शिवसेना ठाणे जिल्हा शहराध्यक्ष रमेश पवार यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्यासह सुविद्य पत्नी सुरेखा भोईर यांना शाल, श्रीफळ, सौभाग्य लेणं, सन्मानपत्र, मानचिन्ह १० हजार रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर या मूळ गावी जन्मलेले देवदत्त भोईर हे २०११मध्ये उद्योग ऊर्जा व कामगार विभाग या शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. पुरस्काराबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे सचिव अरुण पाटकर अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव यांनी खास अभिनंदन केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग संघटनेचे सचिव संजय सरदेसाई यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून आनंद व्यक्त केला.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com